शनिवार । १६ मे १९८१ । एक रुपया

# माणूस

## स. न. वि. वि.

◻ 'रक्तसूट' हा निपाणीतील तंबाखू-उत्पादकांवर झालेल्या गोळीबारासंबंधीचा माणूस ९ मे १९८१ मधील श्री. विजय परुळकर यांचा लेखांक वाचला.

लेख वाचून दुःखाने सुन्न व क्रोधाने तप्त झालो; पण केवळ क्रोधाचा काय उपयोग? विजय परुळकरांना राग आला नव्हता काय?

लेखमालेची सुरुवात करताना ती सुरू करावी की करू नये, अशा जबरदस्त विचित्र मानसिक अवस्थेत परुळकर सापडले होते. त्या त्यांच्या जबरदस्त मानसिक अवस्थेचे त्यांनी जे ज्वलंत चित्रण केले आहे तो खऱ्या अर्थाने वर्षानुवर्षे पिळलेल्या, खचलेल्या, दडपल्या गेलेल्या आणि आता त्यातून बाहेर पडू इच्छिणाऱ्या कोटचवधी भारतीय किसानांचा आक्रोश आहे. तो एक पारतंत्र्या-विरुद्धचा, 'इंडिया' विरुद्धचा आक्रोश आहे.

मध्यमवर्गीय मंडळींना आता फार दिवस झोपेचे सोंग घेता येणार नाही. कोणत्याही सरकारला किसानांच्या जीवनाशी क्रूर खेळ खेळणे परवडणार नाही.

गांधीजींच्या मार्गाने आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी व न्याय मागण्यासाठी आलेला सत्याग्रही शेतकरी सरकारच्या दडपशाही धोरणाला कंटाळून गांधीजींच्या मार्गापासून दूर झाला तर कोणत्याही सरकारची लाठी आणि बंदुकीतील गोळी त्याला थोपवू शकणार नाही!

सरकारी धोरण, शेतकऱ्यांचा आक्रोश व

मलपृष्ठ २ वर



सौ. सुनीताअक्का आणि 'सर' (छायाचित्र : सरोजा परुळकर)

"काळजी वाटून आणि घाबरून काय उपयोग?"

—रक्तसूट (लेखांक दुसरा)

पृष्ठ....११

# उपरेपणा आणि आपलेपणा

श्री. ग. मा.

'दलितांना मातृभूमी कुठे आहे ?' असा प्रश्न डॉ. आंबेडकरानी स्वातंत्र्यप्राप्तीच्या आसपास, तीस-चाळीस वर्षांपूर्वी विचारला होता.

श्री. लक्ष्मण माने याचा 'उपरा' हाच प्रश्न आज पुन्हा सगळ्यांना विचारत आहे. 'या देशाचा खरोखरच मी कोण लागतो ?', 'या देशाने मला काय दिले आहे ?' असे या उपऱ्याचे 'आक्रंदन' आहे. (केसरी–१० मे अंकातील मुलाखत)

'वेदमंत्राहुनी आम्हा, वंद्य वंदे मातरम्' असे गीत गात-म्हणत जेव्हा शेकडो क्रांतिकारक फासावर चढत होते, सहस्त्रावधी-लक्षावधी देशभक्त तुरुंगात खितपत होते तेव्हा खरोखरच या देशाने त्यांना काय दिले होते ? या देशाचे हे सारेजण तेव्हा कोण लागत होते ?

या साऱ्यांपैकी एकानेंही असा प्रश्न विचारल्याची नोंद इतिहासात तरी नाही.

उलट पुनर्जन्म असलाच तर तो याच देशात आपल्याला लाभावा अशी प्रत्येकाची भावना होती.

'प्रासाद इथे रम्य, परी मज भारी। आईची झोपडी न्यारी।' असेच यापैकी प्रत्येकजण समजत होता, त्यासाठी देशी किंवा परदेशी प्रासादसौख्याकडे पाठ फिरवून झोपडीतील कष्टप्रद जिणे आपणहून पत्करीतहोता.

या सगळ्यांना देशाने, समाजानें खरोखरच काय दिले? अशांच्या दहनभूमीवर नाही चिरा, नाही पणती अशी अजूनही स्थिती आहे आणि ते जिवंत होते तेव्हाही समाज काय करत होता ? त्यांना टाळीत होता, मनात आदरभावना असली तरी ती बाहेर, प्रकटपणे व्यक्त करण्यास घाबरतच होता.

¤

त्यावेळी देश सहा हजार मैलावरून आलेल्या मुठभर ब्रिटिशांच्या ताब्यात होता. जे संख्येने टक्काभरही नव्हते. तरीही देश आपला आहे, समाजाचे आपण काही देणे लागतो, ही भावना रुजवण्याचा प्रयत्न साहित्यातून, शिक्षणातून, चळवळीतून केला जात होता.

आज उपरेपणाची, परकेपणाची जाणीव जोपासली-गौरवली जात आहे.

देश आज मूठभर भांडवलदारांच्या, संख्येने तीन टक्केसुद्धा नसलेल्या उच्चवर्णीय ब्राह्मणांच्या तावडीत सापडला म्हणून हा उपरेपणा–परकेपणा आहे, असे सांगितले जाते.

हे खरे मानू. मग संख्येने सत्त्याण्णव टक्के असलेल्या उरलेल्या सर्व समाजाशी तरी आपले नाते असायला हवे. या संख्येने अतिप्रचंड असणाऱ्या बहिष्कृत भारताला तरी आपण आपला भारत मानायला हवे, त्याच्या विकासासाठी, मुक्तीसाठी झगडण्याची आपली तयारी हवी !

उपरेपणाची, परकेपणाची जाणीव जोपासली गेली, साहित्यातून वगैरे प्रतिष्ठा पावली तर हा आपलेपणा कसा


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : पन्नासावा

१६ मे १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

आणि केव्हा निर्माण होणार ? बहिष्कृत भारत तरी कसा उभा राहणार ?

¤

स्वतःला परके आणि उपरे मानणाऱ्यांची संख्या स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. मुसलमानांना हा देश अजूनही आपला वाटत नाही. ते राहणार या भारतात, प्रेम करणार पाकिस्तानावर. एकदा पाकिस्तान तोडून दिल्यावर उर्वरित भारतात तरी पाकिस्तानवाद शिल्लक उरणार नाही अशी तेव्हा काँग्रेसी विचारसरणी होती; पण आता आणखी पाकिस्ताने तोडून मागितली जात आहेत. काश्मिर आणि आसामच नाही तर कच्छ आणि गुजराथवरही हिरवे संकट पसरू पाहत आहे.

लालभाईच्या तत्त्वज्ञानातच देशभक्ती, राष्ट्रभावना यांना स्थान नाही. त्यातून येथली सगळी साम्यवादी चळवळ प्रथमपासूनच मॉस्कोधार्जिणी. चीनच्या आक्रमणानंतर फाटाफूट झाली तरी हा परधार्जिणेपणा संपला नाही. मॉस्कोवादाच्या जोडीला पेकिंगवाद आला, एवढाच फरक पडला.

¤

या परधार्जिणेपणाबरोबरच कमालीचा प्रांतिक दुरभिमान हेही येथल्या डाव्या चळवळीचे एक वैशिष्ट्य आहे. ज्योती बसूंना आजही त्यांचा बंगाल भारतापेक्षा मोठा वाटत असावा. अनेक राष्ट्रांचा मिळून बनलेला भारत हा एक खंड आहे, अशी त्यांची व त्यांच्या पक्षाची विचारसरणी तर जुनीच आहे.

म्हणजे मुसलमान स्वतःला परके समजणार. साम्यवादी आपापल्या प्रांतांना कवटाळून बसणार. हरिजन, दलित, इतर मागासलेले विभाग आपल्याला या देशाने काय दिले, या समाजाशी आपले नाते काय असा प्रश्न विचारून राष्ट्रीय प्रवाहापासून दूर राहणार ! अशा दूर राहण्याचं हळूहळू तत्त्वज्ञान बनणार, या दूरत्वाच्या जाणीवेला प्रतिष्ठाही दिली जाणार आणि या सगळ्याचा शेवट दिसत असूनही आपण प्रतिगामी ठरू म्हणून येथील मुख्य राष्ट्रीय प्रवाहाचे प्रवक्ते गप्प राहणार, मौन पाळणार किंवा गुळमुळीत बोलत राहणार !

यातून देशाचे आणखी तुकडे होत राहतील.

कसाही असला तरी उपरे म्हणवणाऱ्यांनी, परके समजणाऱ्यांनी प्रथम या काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या देशाला आपला स्वदेश मानायला हवे. जातीपातीत, भाषिक गटात विखुरलेल्या सगळ्या समाजाशी आपले नाते आहे, असा विधायक दृष्टिकोण प्रथम निर्माण व्हायला हवा. हा वर्ग जाऊन तो वर्ग आला, अगदी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांची संख्या सक्तीने वाढवली तरी ही विधायकता आपोआप येणार नाही. ती जोपासावी लागते. त्यासाठी मला देशाने काय दिले, समाजाचा मी कोण लागतो ही वृत्ती उपयोगी नाही. साडेतीन टक्केवाल्यांचा, मूठभर ब्राह्मणांचा, शोषक भांडवलदारांचा कधी सकारण, कधी अकारण द्वेष करताना उर्वरित साडेशहाण्णव टक्के समाजापासून आपण दूर जाण्यात कसलाही पुरोगामीपणा, क्रांती वाद वगैरे नाही. क्रांतिकारक समाजाला देत असतो. समाजाकडून घेणाऱ्यांनी कधीच, कुठल्याच क्रांतीचे निशाण, कुठेही फडकवलेले नाही. आधी संपूर्ण समाज, हा अखंड देश आपला माना. परकेपणा टाकून द्या ! या आपलेपणातून क्रांतीची, परिवर्तनाची वाट सापडू शकते. नाही तर सिनेमे आणि परिसंवाद यापुढे क्रांतिवादाची मजल जाणे अशक्य आहे.

□



## मुक्ताफळे

# काही आधुनिक स्मारके

एखादा मोठा माणूस निधन पावला की, प्रथम मोठी पोकळी निर्माण होते. त्या माणसाचे जे निकटवर्ती असतात ते सुतकाच्या काळात, मोठमोठ्याने सांगत असतात–'ही पोकळी भरून येणे शक्य नाही.' हळूहळू निकटवर्तियांच्या ध्यानात येते की, पोकळी भरून आलेली तर दिसत नाहीच, पण आता पोकळीच दिसत नाही! पोकळी दिसत होती तोपर्यंत ती त्या दिवंगत महापुरुषाचे स्मारक होती. आता पोकळी बेपत्ता झाल्याने, त्या माणसाचे दिसेल असे काही तरी स्मारक केले पाहिजे.

जयप्रकाश नारायण गेले आणि पोकळी झाली. नंतर सर्व, जयप्रकाशभक्तांनी प्रथम जनता पक्ष मोडीत काढला आणि इंदिरा गांधींनी पाहता पाहता सर्व पोकळ्या भरून काढल्या. जयप्रकाश होते की नव्हते झाले. अनुयायांची पांगापांग झाली. या बाजूने मधू लिमये-फर्नांडिस आणि म्हणून पाठोपाठ गोरेबाई गेल्या. त्या बाजूने चंद्रशेखर, मधू दंडवते गेले. इंदिरा गांधीजींनीच मग शेवटी ठरवले की, जयप्रकाशांचे काही तरी स्मारक करायला हवे. इंदिराजींनी जयप्रकाशांना जिथे डाबून ठेवले होते ती खोली खरे म्हणजे जयप्रकाशाचे चांगले स्मारक! त्या खोलीवर पाटी लावायची–'आणीबाणीत जयप्रकाश यांना इंदिरा गांधींनी इथे ठेवले होते.' पण असे केल्याने ते आणीबाणीचे पण स्मारक होते. ती आठवणच नको म्हणून इंदिराजींनी स्मारकासाठी समिती स्थापन केली आणि या समितीवर चंद्रशेखर आणि मधू दंडवते याना बोलावले. दोघे लगेच गेलेच.

पूर्वी एकदा असेच झाले होते.

छत्रपती संभाजीमहाराजाचा औरंगजेबाने वध केल्यानंतर, महाराष्ट्रात पोकळी निर्माण झाली. संभाजीमहाराजांचे स्मारक करायला कोणी हिंदू माणूस पुढे येईना. तेव्हा खुद्द बादशहानेच स्मारक समिती स्थापन केली. या समितीवर काम करण्यासाठी रामदासशिष्य कल्याणस्वामींना पाचारण केले; पण कल्याणस्वामींनी काहीच लक्ष दिले नाही आणि एक मोठी संधी हुकवली. त्या वेळी किमान अश्वारूढ पुतळ्याचे स्मारक तरी महाराष्ट्राच्या पदरात पडले असते. आज महाराष्ट्रात जिकडे तिकडे चोहिकडे शिवाजीमहाराजांचे पुतळे झाले आहेत; पण संभाजीमहाराज, जे त्यांचेच पुत्र होते आणि ज्यांनी धर्मरक्षणार्थ प्राणांची बाजी लावली, त्यांचा एक तरी पुतळा दिसतोय का? शिवाजीमहाराजाच्या नावाने जी विडी होती, ती लोकांच्या भावना लक्षात घेऊन विझली नाही तर नामांतरित झाली. 'छत्रपती संभाजी विडी' जोरात धंदा करते आहे. संभाजीमहाराजाच्या नावाने लोक फक्त विडया ओढीत आहेत हे दृश्य चांगले का? पण असू द्या–ओढू द्या विडया! संभाजीमहाराजांचे तेवढेच एक रसरशीत स्मारक आज उपलब्ध आहे. तात्पर्य काय, कल्याणस्वामींनी काही चांगले केले नाही.

पण ही चूक चंद्रशेखर व मधू दंडवते यांनी मुळीच केली नाही! ते दोघे इंदिरानिर्मित जयप्रकाश स्मारकाच्या पवित्र कार्यात दाखल झाले; पण चांगली गोष्ट कुणाला पाहावते? बगाराम तुळपुळे नावाचे एक जयप्रकाशभक्त कामगार कार्यकर्ते आहेत. त्यांनी ११-४-८१ च्या 'साधना'मध्ये लिहिले–

'पंतप्रधान व त्यांचे सत्तास्थानातील होयबा हे अगदी अलीकडे जे. पीं. ना 'देशद्रोही', 'परराष्ट्राचे हस्तक', 'सी. आय. ए. चे दलाल' म्हणून जाहीरपणे धिःकारत होते आणि त्याचवेळी जे. पी. स्वतः काहीही प्रत्युत्तर देऊ शकणार नाहीत अशी व्यवस्थाही त्यांनी करून ठेवली होती–अशा या मंडळींनी जे. पी. च्या स्मारकाच्या गोष्टी करणे म्हणजे शुद्ध ढोंगीपणा म्हटला पाहिजे ..'

अरेरे! काय ही कृतघ्नता! मागे डायलिसिस मशिन आणण्याकरता इंदिराजी पाच लाख रुपये देत होत्या तेदेखील या कृतघ्नांनी नाकारले आणि रुपया रुपया जमवण्याचा अट्टाहास केला. आता जनता पक्षच डायलिसिसवर गेल्याने जयप्रकाशांच्या स्मारकाचे काम त्या करू पाहतात, तर बगारामाचे हे लिहिणे!

लगेच दुर्गाबाई भागवत पुढे सरसावल्या. त्यांनी टाइम्समध्ये २८-४-८१ ला पत्र लिहिले–

'या समितीच्या अध्यक्षा आहेत इंदिरा गांधी. त्यांना या समितीवर राहण्याचा नैतिक अधिकार नाही हे स्पष्ट असताना जनता पक्षाध्यक्ष चंद्रशेखर व मधू दंडवते यांनी या समितीचे सदस्यत्व स्वीकारले ही बाब केवळ दु:खाचीच नव्हे, तर अध्यक्षीणबाईला नीतिमत्तेचे शिफारसपत्र देण्यासारखे हे आहे. जयप्रकाशाचे स्मारक कुठलीही समिती करू शकणार नाही. हाडामांसाचा सच्चा कार्यकर्ता हेच त्याचे स्मारक आहे.'

अहो, कुठे आहेत ती हाडामासांची स्मारके? आणि लोकसाक्ष शुद्धी झाल्यावर सती जानकीला नीतिमत्ता नाही म्हणता? मधु पानवलकर हे समाजवादी विचारवंत पुढे आले. त्यांनी म. टाइम्समध्ये पत्र लिहून दुर्गाबाईंना सुनावलं–

'ज्याला त्याला उगीच फटकारण्याची सवय दुर्गाबाईंनी सोडून दिली तर बरे होईल–सोवळे नेसून घरात वावरता येते. बाहेर नाही, याचा विसर न पडावा ही विनंती.'

आमचेही तेच म्हणणे आहे. काहीही न नेसता माणसाने बाहेर वावरले पाहिजे. नंगेसे खुदा भी डरता है ना? ऊठसूट आपलं फटकारत सुटायचं म्हणजे काय! स्मारक हवंय की नको? इंदिराजींच्या तंबूचे कळस कापून आणण्याची स्वप्ने पहाण्यात अर्थ नाही. संताजी, धनाजी सगळे इंदिरा कॉंग्रेसमध्ये घुसताहेत. काय इंदिराजी करतील ते जयप्रकाशांचे स्मारक पदरात पाडून घ्या. नाही तर कालांतराने नुसती

'जयप्रकाश विडी' उरेल, संभाजी महाराजां-सारखी—स्मारक म्हणून !

आता स्मारकांचेही दोन प्रकार आहेत. मरणोत्तर स्मारक आणि जिवत असतानाचे स्मारक. जे महान पुढारी असतात त्यांचे स्मारक मरणोत्तर करण्याची प्रथा आहे; परंतु जे 'गहन' पुढारी असतात त्याचे स्मारक लोक हौसेने जिवंतपणीच करतात. गहन पुढारी म्हणजे ज्याचे काही कळतच नाही असे पुढारी.

बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, यशवंतराव चव्हाण यांची स्मारके लोकांनी जिवंतपणीच केली. खटावला 'यशवंतराव चव्हाण महाविद्यालय' आहे. आता 'होतेच' म्हटले पाहिजे ! कारण परवा म्हणजे ८।५। ८१ ला वाईट बातमी आली. यशवतराव चव्हाण यांच्या नावाची पाटी बदलून 'शहाजी-राजे महाविद्यालय' असे नामातर करण्याचा समारंभ त्या दिवशी झाला. आता यशवंत-रावाचे स्मारक केले तेव्हाही खटावच्या लोकाचे काही म्हणणे नसावे, आताही काही दिसत नाही. खटावकरांनी तेव्हाही टाळ्या पिटल्या आणि आताही वाजवल्या !

हे अभिनव नामातर घडले तेव्हा खटाव महाविद्यालय चालवणाऱ्या मंडळाचे अध्यक्ष चंद्रहार पाटील म्हणाले—

'यशवतराव चव्हाणाचे नाव या महा-विद्यालयाला देण्यामागे हेतू होता की, या निमित्ताने जनतेचे प्रश्न सुटण्यास मदत होईल. चव्हाणाप्रमाणे अनेक मत्री व उद्योग-पती इथे येऊन गेले; पण नुसत्या आशीर्वा-दाने प्रश्न सुटत नाहीत. यशवंतराव सत्तेवर होते म्हणून त्याचे नाव दिले व आता ते सत्तेवर नाहीत म्हणून काढून टाकले असे नसून नाव बदलण्याचा निर्णय पूर्वीच घेतला गेला आहे. श्री. चव्हाण याचेवर कोणी केले नसेल येवढे 'प्रेम' आम्ही केले. आजही ते कमी झालेले नाही; पण लोकाचे प्रश्न सम-जावून घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न झाला नाही हीच आमची तक्रार आहे !'

काही कळलं का मंडळी हे वाचून ? महा-विद्यालय हे शिक्षणासाठी काढतात की जन-तेचे प्रश्न सोडवण्याचे ठिकाण म्हणून ? हे सगळे अगम्य आहे ! शिवाय चव्हाणावरचे खटावकराचे प्रेम कायमच आहे.

आता या चंद्रहाराचे मणी नामातराचे प्रमुख पाव्हणे कायदेमत्री बॅ. बाबासाहेब भोसले यानी ओरबाडून काढले. ते म्हणाले—

'यशवंतराव चव्हाणाचे नाव या महा-विद्यालयाला दिले ते चव्हाण सत्तेवर होते म्हणूनच व आता काढले ते सत्तेवर नाहीत म्हणूनच ! तुम्ही वीस वर्षे रस मिळेल म्हणून डोक्यावर घेतलात तो ऊस नव्हताच. तो बांबू होता. मग रस कसा मिळणार ?'

सगळेच इंदिराजीच्या सभेचे बाबू. एका बाबूने असे दुसऱ्या बांबूला का बरे हिणवावे? एखाद्याचे स्मारक करून त्याचा अपमान करण्याची ही पद्धत अगदी नवीन नाही बरं. मारक्यूस म्हणाला होता—

'I would much rather have men ask why I have no statue, than why I have one.'

पुतळा असण्यापेक्षा लोकानी तुमचा पुतळा का नाही बरं, असं विचारण्यात अधिक मौज असते. कारण मग लोकांना अशी खटावकरी मौज करता येत नाही !

परंतु आम्हाला विचाराल तर चंद्रहार पाटलानी फार घाई केली असंच आम्ही म्हणू. चव्हाण कॉंग्रेस, इंदिरा कॉंग्रेसमध्ये विलीन होण्याचा मुहूर्तच फक्त काय तो ठरायचा आहे. अशावेळी जरा थाबणे इष्ट होते. उद्या यशवंतराव इंदिराजीमय होऊन केंद्रात मत्री झाले, म्हणजे आली का पंचा-ईत ? शहाजीराजाना पुन्हा डच्चू. पुन्हा आपले खटावला यशवतराव चव्हाण महाविद्यालय ! शहाजी भोसले तर इतिहासजमाच आहेत, तसे मग बाबासाहेब 'भोसलेही व्हायचे अशी शक्यता दिसते आहे.

तात्पर्य, तुर्त स्मारक व्हायचे तरी इदिरा गांधी हे नाव लागते आणि असलेले स्मारक टिकवून धरायचे तरी इंदिरा गांधी हेच नावं लागते !

—ग्यानबा

# कॉंग्रेस एकीकरण

## लोटांगणवाल्यांची अधीरता !

वा. दा. रानडे

दोन कॉंग्रेस पक्षाच्या एकीकरणाचे वारे पुन्हा वाहू लागले आहे. गेल्या काही दिवसातील घटना या दृष्टीने सूचक आहेत. पंतप्रधान श्रीमती इदिरा गांधीविरुद्ध सहाव्या लोकसभेने हक्कभंगाचा ठराव पास केला होता. तो निरस्त करणारा ठराव अर्स कॉंग्रे-सचे एक सभासद, माजी सभापती बळिराम भगत यांनी लोकसभेत मांडला व तो पास झाला. अर्स कॉंग्रेसच्या बाकीच्या सभासदानी ठरावाच्या बाजूने प्रत्यक्ष मतदान केले नाही; पण यशवंतराव चव्हाणांनी ठरावास अनु-कूलता दर्शविली होती अशा बातम्या आहेत. नव्या एकीकरण प्रयत्नांबद्दल चव्हाणाची प्रतिक्रिया लक्षात घेता या बातम्या अगदीच प्रचारकी व निराधार असतील असे मान-ण्याचे कारण नाही. चव्हाणानी एकीकरण प्रयत्नाबद्दल स्पष्ट मत व्यक्त करण्याचे नाका-रले. दोन्ही कॉंग्रेस पक्षात आज मतभेद असले तरी उद्या असणार नाहीत. आणखी पाच-पंचवीस वर्षे तरी हा देश कॉंग्रेसकडेच राहू-णार, असे कलकत्त्यातील एका भाषणात त्यांनी म्हटले होते.

शेतकऱ्यांच्या दिंडीप्रकरणात शरद पवारां-वरील सर्व खटले काढून घेतल्याची घोषणा मुख्यमंत्री अंतुले यांनी केली, त्याच वेळी दोन कॉंग्रेस पक्षाच्या एकीकरणाची शक्यता सूचित केली. या दोन घटनाचा एकमेकाशी काही संबंध आहे असा सभ्रम निर्माण कर.

ण्याचा अंतुले यांचा उद्देश असावा. शरद पवारांनी इंदिरा कॉंग्रेसमध्ये येण्याची तयारी दर्शविल्यानेच त्यांच्यावरील खटले काढून घेतले, असा संभ्रम त्यांना निर्माण करावयाचा होता. शरद पवारांनी एकीकरणाची बोलणी झाल्याचा इन्कार केला. कदाचित ती अधिकृतपणे झाली नसतील; पण अनधिकृतपणे झाली असावीत. शरद पवारांनी राजीव गांधींची दोन वेळा भेट घेतल्याचे महाराष्ट्राचे एक राज्यमंत्री अभयसिंहराजे भोसले यानी सांगितले. शरद पवार ऐक्यासाठी अधीर झाल्याचा आरोप त्यांच्या पक्षातल्याच जगजीवनराम गटाच्या लोकांनी केला आहे. अर्स कॉंग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक जिंकून पक्षाची सूत्रे आपल्याकडे येण्याची शक्यता कमी आहे, असे दिसू लागताच शरद पवारांना एकीकरणाची घाई झाली, अशीही टीका करण्यात येत आहे. या टीका, आरोप शब्दशः घ्यावयाचे नसतात. ते करणाराचे त्यामागचे काही उद्देश असतात ते लक्षात घेऊनच अशा आरोपाचा विचार करायला हवा.

एकीकरणास पक्षाच्या बहुसंख्य सभासदांचा विरोध असल्याने ते शक्य नाही असे देवराज अर्स यानी सांगितले. बहुसंख्य सभासदाचा विरोध आहे असे श्री. अर्स कशाच्या आधारावर म्हणतात ? सध्याच्या कार्यकारणीचे बहुसंख्य सभासद विरोधी असतील; पण याचा अर्थ सर्वसामान्य सभासदांपैकीही बहुसंख्य त्या मताचे आहेत असा कसा लावता येईल ? पक्षाचे औरंगाबादला व्हावयाचे अधिवेशन आणि अध्यक्षीय निवडणूक सहा महिने पुढे ढकलण्यात आली आहे, या निर्णयावर जगजीवनराम यांनी टीका केली आहे. पक्षाचे नेतृत्व आपल्या हाती राहते की नाही, तसेच बहुसंख्य सभासद एकीकरणाच्या बाजूने निर्णय घेतील काय अशी शंका वाटत असल्यानेच अधिवेशन पुढे ढकलण्यात आले असले पाहिजे; पण पोटनिवडणुकांचे निमित्त त्यासाठी पुढे करण्यात आले आहे.

'अर्स कॉंग्रेसला आज ना उद्या इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाण्याशिवाय दुसरा पर्याय मला दिसत नाही,' असे महाराष्ट्रात शरद पवार गटाशी निगडीत असलेले एक कार्यकर्ते नरूभाऊ लिमये यानी एका लेखात म्हटले आहे. हे मत अर्स कॉंग्रेसमधील एका प्रवाहाचे निदर्शक आहे. आजच एकीकरणाची घाई नको असा लेखाचा सूर असला तरी एकीकरणास अधीर झालेली मंडळी आता फार दम धरतील असे वाटत नाही. निदान सहा महिने या प्रश्नाचा निर्णय पुढे ढकलावा या उद्देशाने पक्षाचे अधिवेशन सहा महिने पुढे ढकलण्यात आले, पण एकीकरणवादी गट तेवढासुद्धा दम न धरता इंदिरा कॉंग्रेसच्या गटात दाखल होण्याची शक्यता आहे.

काही निश्चित तात्त्विक भूमिकेच्या पायावर हे एकीकरण होणार आहे का ? तसे दिसत नाही. हे इंदिरा काग्रेसपुढे लोटांगण किंवा शरणागती आहे. १९७७ च्या पराभवानंतर नवीन वर्षातच इंदिरा काग्रेसने पुन: सत्ता मिळविली. उलट अर्स कॉंग्रेसची वाताहत झाली. इंदिरा काग्रेसला व जनता पक्षाला प्रभावी पर्याय आमचाच पक्ष असा दावा या पक्षाची नेतेमंडळी करत होती; पण गेल्या तीन वर्षांतील त्याची कामगिरी पाहता कणा नसलेला पक्ष अशीच त्याची प्रतिमा जनमनात निर्माण झाली आहे. या पक्षाला भवितव्य नाही हे ओळखून वसंतदादाचा गट पूर्वीच इंदिरा काग्रेस या गोटात दाखल झाला. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत अर्स कॉंग्रेसला फक्त १३ जागा व ५. ३० टक्के मते मिळाली. जागांच्या दृष्टीने विरोधी पक्षात त्याचा क्रम पाचवा व मताच्या दृष्टीने चौथा लागला. एकाधिकारशाहीला विरोध, पक्षातर्गत लोकशाही, सामुदायिक नेतृत्व या तत्त्वावर हा पक्ष अधिष्ठित झालेला होता; पण कसोटीच्या प्रसंगी त्याने कचखाऊ भूमिका घेतली. चिकमंगळूरच्या निवडणुकीत इंदिरा गांधींविरुद्ध त्याने आपला उमेदवार उभा केला नाही किंवा विरोधी आघाडीच्या उमेदवारालाही पाठिंबा दिला नाही. मग एकाधिकारशाहीला यांचा कणखर विरोध आहे असे कसे म्हणावयाचे ? पश्चिम बंगाल व केरळमध्ये मार्क्सवाद्यांना विरोध करण्यासाठी इंदिरा कांग्रेसशी युती करण्यास या पक्षाच्या नेत्यांची तयारी आहे. मग या पक्षाला ठाम इंदिराविरोधी कसे म्हणावयाचे ?

इंदिरा कांग्रेसला लोकसभेत व विधानसभांमध्ये मोठे बहुमत असताना एकीकरण कशासाठी हवे आहे ? निवडणुकीत यश मिळविले असले तरी नेहरूंच्या काळातील कॉंग्रेसची जागा आपण घेऊ शकलो नाही, तशी प्रतिष्ठा मिळवू शकलो नाही याची जाणीव इंदिरा कॉंग्रेसच्या नेत्याना होऊ लागली आहे. सर्व जुन्या-नव्या कॉंग्रेसवाल्यांची पूर्वीसारखी प्रबळ कॉंग्रेस स्थापन झाली तर त्यांना हवी आहे, पण अर्स कॉंग्रेसमधील एक गट त्याना मिळण्यापलीकडे या प्रयत्नात अधिक यश येण्याची शक्यता सध्या तरी दिसत नाही.

□

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
**मूल्य : रुपये पंधरा**

## उत्तरमीमांसा : ५ :

स. शि. भावे

# लेखक : लेखनातला मनातला आणि चर्चेतला

गेले दोन तीन दिवस हा विषय मनात चुरचुरतो आहे. मोकाशीच्या मुलाखतीसाठी काही प्रश्न तयार करायचे आहेत. चार दिवसापूर्वीच कोठावळयाचे पत्र आले आहे. त्याआधी आठ दिवस समक्षही त्यानी सांगितले होते. पण इतक्या टोचण्या मिळूनही हवे तसे प्रश्न अजून मनात उगवलेले नाहीत.

दुसरेच तपशील मनात येत आहेत. मॅजेस्टिक ग्रंथप्रदर्शनाची आणि संध्याकाळच्या साहित्यिक गप्पांची आठ वर्षे झाली. हे नववे वर्ष. केशवराव कोठावळयांचा उत्साह कमी न होता वाढतोच आहे. गेल्या काही वर्षांत त्यानी हा उपक्रम अधिकाधिक शिस्तीचा आणि आकर्षक केला आहे. मॅजेस्टिकची गच्ची आता आणखी उंचीवर गेली आहे व अधिक प्रशस्त झाली आहे. पुस्तकप्रदर्शनाचे दालनही प्रशस्त झाले आहे. त्यामुळे पुस्तके चाळणारांना उसंत आणि मोकळेपणा मिळू लागला आहे. गच्चीवर चर्चा चालू आहे. खालच्या दालनात साहित्यिकांचा आपापसात परिहास चालू आहे. पुस्तकप्रदर्शनाच्या दालनात सर्व वयाचे स्त्री-पुरुष पुस्तके पाहत आहेत. या दोन्ही दालनांत गच्चीतल्या गप्पा ऐकण्याची सोय आहे. साहित्यिकांना आरंभी चहा-बिस्किटे व नंतर सरबत असे सांस्कृतिक अनुपान आहे. सांस्कृतिक सायंकाळ कशी असावी, सांस्कृतिक पंधरवडा कसा असावा याचा जणू आदर्श मॅजेस्टिक प्रदर्शनाने व मॅजेस्टिक गप्पांनी गेली आठ-नऊ वर्षे निर्माण केला आहे.

वर सांगितलेले सास्कृतिक संघटन दुरापास्तच म्हणावे लागेल. इतक्या बारीक-सारीक तरतुदी, इतक्या शिस्तीत जमा करणे हे महाकठिण; पण ते प्रयत्नांनी शक्य आहे साऱ्या साहित्यिकांना, विचारवंतांना, भिन्न भिन्न प्रकृतीच्या श्रोत्यांना, हसते-खेळते एकत्र ठेवणे, त्यासाठी अनेकांचे सहकार्य मिळवणे, हे मात्र मराठीच काय पण कोणत्याही साहित्यविचार क्षेत्रात अशक्यच म्हणावे लागेल. कारण म्हटलेच आहे,बोद्धारः मत्सरग्रस्ता । पण केशवरावानी हे सारे जमवले आहे आणि नऊ वर्षे कायम ठेवले आहे. त्याच्यातील नेमक्या कोणत्या गुणवैशिष्टयामुळे त्याना हे जमले हे सांगणे कठिण आहे; पण असा दुर्मिळ गुणसमुच्चयाचा अखंड झरा त्यांच्याजवळ आहे हे स्पष्ट आहे.

अर्थात, आणखी एका वैशिष्टयाचा मुद्दाम उल्लेख या संदर्भात करायला हवा. पुणे हे स्थळ आणि पुणेकर हे श्रोते या वैशिष्टयाशिवाय या उपक्रमाला मिळाले एवढे यश मिळाले नसते. पंधरा दिवस, सातत्याने, इतक्या विचक्षण मार्मिकतेने, योग्य ठिकाणी, योग्य ती दाद देणारा श्रोतृवृंद पुण्याखेरीज इतरत्र मिळाला असता की नाही याबद्दल शंका वाटते. याबरोबर हेही खरे की पुण्यातल्याच कोणी असा उपक्रम केला असता तर सर्व पुणेकरांचा असा प्रतिसाद मिळालाच असता अशी खात्री देता येत नाही. मुंबईचे कोठावळे, पुणे ठिकाण, पुण्यातले खास मर्मज्ञ श्रोते—असे हे दुर्मिळ रसायन इथे जमले आहे. या दुर्मिळ एकजीव रसायनाला अपूर्व असे यश लाभले आहे. आपापल्या कलानुसार कोणी याला योगायोग म्हणतील, तर कोणी ऐतिहासिक अपरिहार्यता म्हणतील.

... मोकाशीना विचारायचे प्रश्न अजूनही उगवलेले नाहीत. मॅजेस्टिक उपक्रमासंबंधीच्या विचाराचे एक वळण पुरे झाल्यावर मोकाशीची मुलाखत पुन्हा मनात चुरचुरू लागली.

प्रश्न सुचत नव्हते. म्हणजे नेहमीचे प्रश्न असतात. लेखनाला सुरुवात कधी केली ? लेखनामागील प्रेरणा कोणत्या ? लेखनादर्श कोण कोण ? कोणत्या पाश्चात्य-पौरस्त्य साहित्यविषयक चळवळीने प्रभावित झालात? समकालीन आणि नव्या साहित्यापैकी कोण विशेष आवडतात ? नव्या लेखकाना संदेश?

प्रश्न सुबक. चांगले. व्यवस्थित. कोणाही लेखकाला केव्हाही विचारावे असे; पण मोकाशीना खास काय विचारावे ? म्हटले, सुरुवातीपासून सुरुवात करू या.

मोकाशी प्रथम केव्हा वाचले ? पंचेचाळीस-शेहेचाळीस साल होते. 'धनुर्धारी'चा दिवाळी अंक होता. 'काय रानटी लोक आहेत' ही मोकाशीची कथा होती. त्या कथेने मला आकर्षून घेतले. त्या वेळी माझे वय शाळकरी होते, वृत्ती भावुक होती. आज भावुकता मुळात कमी झालेली आहे असे नव्हे; पण अनुभवाचे घट्टे त्या वेळी पडलेले नव्हते; पण त्या कोवळेपणात आवडलेली ती कथा नंतरही आवडत राहिली. चार-पाच वेळा तरी मी ती वाचली असेल !

मोकाशीचे नंतरचे बहुतेक लेखन मी वाचले आहे. 'लामणदिवा' हा पहिला संग्रह. नंतरचे कथासंग्रह, 'पालखी,' 'अठरा लक्ष पावलं', 'देव चालले', 'आनंदओवरी', 'वात्स्यायन', परवाचे 'संध्याकाळचे पुणे'— अशी पुस्तके फार मन लावून वाचली. इतरांना वाचायला लावली. मला आठवते, माझा सध्या अमेरिकेत मिलवॉकीला असलेला गणितज्ञ मित्र मधुकर देशपांडे याला तर मी 'पालखी'चे परीक्षण लिहायला लावले होते ! ते परीक्षण त्या वेळी, बहुधा मे-जून ६२, 'सत्यकथे'त प्रसिद्ध झाले होते. त्यांच्या विज्ञानकथाही वाचल्या. त्यांच्या 'आता आमोद सुनासि आले', किंवा 'अश्व म्हणजे घोडा' अशा कितीक कथा मनात खोलवर जाऊन बसल्या. 'चापलूस' सारख्या दुसऱ्या कितीक खेळकर कथा मनाला पुन्हा पुन्हा सुखवीत राहिल्या; पण 'काय रानटी लोक आहेत' या कथेचा ठसा पुसला गेला नाही !

मोकाशीच्या लेखनाचा आणि मनाचाही गाभाच जणू मला त्या कथेत सापडला होता. सकाळी लग्न झालेल्यांची ती पहिली रात्र. ती रात्र गप्पात संपते. एकमेकाना समजून घेण्यात संपते. स्पर्श न करता संपते; पण सकाळी दार उघडताना आप्तेष्टांची चेष्टा मात्र वेगळया पातळीवर असते. रात्रभर

जळता दिवा, जागरणाने लाल आणि ताठ झालेले डोळे या तपशिलाचा सामान्यपणे घ्यायचा तो अर्थ आप्तेष्ट घेतात. या दोघांचा खास, वेगळा अनुभव त्या दोघानाच फक्त माहीत असतो. त्याचा खास आनंद, स्पर्शापलीकडे जाऊन एकमेकांना मिळविल्याचा आनंद, त्या दोघांनाच जाणवत असतो. तो आनंद जणू त्यांच्या सर्वांगात स्रवत असतो. हा आनंद फक्त आपला आहे, इतरांपेक्षा आपण वेगळे आहोत, आपण रानटी नाही, आपल्याला कधी रानटी असायचे नाही– अशी अकलंकित, निरामय अनुभूती त्याना येत असते.

मला तेव्हापासून जाणवले की, 'रानटी नसणे, माणूस असणे' हा मोकाशीच्या वृत्तीचा गाभा आहे. हा गाभा त्यांच्या केवळ बुद्धीला कळलेला आहे असे नव्हे तर तो आचरणात आला तरच खरे, अशीही मोकाशीची धारणा आहे.

'पालखी', 'अठरा लक्ष पावलं', 'आनंदओवरी' या पुस्तकांच्या वाचनात नंतर अधिक स्पष्टतेने, अधिक तपशिलाने हा गाभा कळत गेला; पण त्या कथेतच तो आरंभी पक्केपणाने जाणवला होता.

म्हणून, फर्गसनच्या 'साहित्य सहकार'चा कार्यवाह झाल्यावर मला प्रथम आठवण झाली ती मोकाशीची. मोकाशीना आठवते की नाही कोण जाणे. पण लेखकाच्या उपस्थितीत, त्याच्या लेखनावर 'सहकार'च्या विद्यार्थी सदस्यांनी चर्चा करायची या माझ्या नव्या उपक्रमाचा पहिला कार्यक्रम मोकाशीच्या कथेवरील चर्चेचा होता. व्यंकटेश माडगूळकर, अरविंद गोखले, संजीवनी, पु. भा. भावे, शंकर पाटील अशी मंडळी या उपक्रमात नंतर आली; पण पहिला कार्यक्रम मोकाशीचा होता! मोकाशीकडे मी प्रथम का गेलो? मनावर त्यांच्या जीवनदृष्टीचा जो पहिला ठसा उमटला होता त्यामुळे गेलो असणार असे आज मागे वळून बघताना वाटते.

मोकाशीवर तेव्हापासून मी विचार करू लागलो होतो. माणूस प्रथमदर्शनी साधा वाटे, हा साधेपणा आवडे. मात्र साधा म्हणजे भोळा नव्हे! मोकाशी कधीही भोळे वाटले नाहीत. तेही मला आवडले. भोळेपणा, मग तो खरा असो की लटका, मला नेहमी अस्वस्थ करतो. ज्यावर अवलंबून राहता येत नाही असे हे काही तरी आहे असे थोडे भयच वाटते. बिनभोळया, सरळ, रोखठोकपणाचा कसा आधार वाटतो.

मोकाशीही तसे रोखठोक किंवा फटकळही. बहुधा लहानपणी ते भलतेच कोपिष्ट असावेत. नंतर भल्या साधनेने त्यानी कोपाचा आविष्कार बंदिस्त केला असावा. कोप रानटी म्हणून! पण आजही त्यांच्या डोळयात एखाद्या क्षणी कोपाची काडी भक्कन पेटते, पाहणाऱ्याला दिसते.

आतल्या आत ते सतत व्रतस्थ असावेत असेही जाणवत गेले. 'पालखी' आणि 'अठरा लक्ष पावलं' यातला त्यांचा 'मी' अलिप्त, पण अती दक्ष निरीक्षक आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांच्यासंबंधी सांगतात तसे सूक्ष्म निरीक्षण, आपल्यापुरता फटकळपणा, आणि परिस्थितीतल्या विसंगतीबद्दल जाणवणारा कोप याचे मिश्रण त्यांच्यातल्या या निरीक्षकात जाणवते.

व्रतस्थ माणूस असा असतो. स्वतःचा निर्लेपपणा तो कटाक्षाने जपतो. इतरांचे आक्रमण किंवा इतरांची लुडबूड व्रतस्थाला खपत नाही. त्याचप्रमाणे, इतराच्या बोलण्यावागण्यातली विसंगतीही त्याला सहन होत नाही. अशा व्रतस्थ माणसाचे वास्तवातले उदाहरण द्यायचे तर सुप्रसिद्ध कथालेखक व गरवारे व्यापार महाविद्यालयाचे प्राचार्य शरच्चन्द्र चिरमुले याचे देता येईल.

'पालखी', किंवा 'अठरा लक्ष पावलं' यात मोकाशीचे असे सात्त्विक कोपाचे क्षण बरेच आलेले आहेत. ते क्षण वास्तवही आहेत, आणि परिणामकारकही झाले आहेत. काही क्षणी मोकाशी काहीसे प्रमाणाबाहेर रागावले आहेत असेही वाटू शकेल; पण मोकाशीची ही व्यक्त चीड एका मूल्याच्या आधारे भक्कम उभी असते. ते मूल्य म्हणजे माणसाच्या आंतरिक सुसंगतीचे मूल्य.

या कोपिष्टपणाकडून पूर्ण वैराग्याकडे जाणे हा अगदी सरळ प्रवास होता. मोकाशीनी तो पुरा केला असावा याची साक्ष 'आनंद ओवरी'त मिळते. 'पालखी' किंवा 'अठरा लक्ष पावलं' यात या वैराग्याचे, वैराग्याकडील ओढीचे दर्शन आहे; पण वैराग्यापर्यंत पोचणाऱ्या प्रवासाचे संगतवार, जिवंत दर्शन आहे ते 'आनंद ओवरी'त. ही तीनही पुस्तके जर एकत्र आणि क्रमाने वाचली तर मोकाशीच्या आंतरिक गाभ्याचे मर्म लक्षात आल्यावाचून राहणार नाही!

म्हणजे मोकाशी हे संत आहेत का? तर असे म्हणावे लागेल की अनुभूतीच्या एका मानसिक पातळीवर हे संतत्व त्यांना प्राप्त झालेले असावे. गराड्यात ते असतात; पण तसे एकटे एकटे असतात. साधारण तात्त्विक वादात ते हिरीरीने पडत नाहीत, ते त्यांना वादात बोलता येत नाही म्हणून नव्हे, तर अशा वादाचा मुळातला व्यर्थपणा त्यांना मनोमन पटलेला आहे म्हणून. आधि-व्याधीबद्दल ते कंडाकडा तक्रार करीत नाहीत, ते त्याना त्रास होत नाही म्हणून नव्हे, तर त्रासाबद्दल तक्रार करणे हा एक अर्थशून्य केविलवाणेपणा आहे असे त्यांना पटले आहे म्हणून. हा निरर्थकतेचा मंत्र मोकाशीच्या मौनातूनच मुख्यतः व्यक्त होत असतो; पण कधीकधी विलक्षण कडवटपणाने त्यांचे शब्द या निरर्थकतेच्या धारेने समोरच्या माणसाला कापू शकतात. मोकाशीच्या बोलण्यात अशा वेळी थंडगार त्वेष जाणवतो. त्यांच्या फिक्या रंगछटेच्या टपोऱ्या डोळयात अशा क्षणी तात्त्विक क्रौर्यही जाणवते. अत्यंत शहाण्या पण जीवन-व्यवहारात नेहमीच सामान्य पातळीवर वावरत आलेल्या व्रतस्थ माणसाचे हे तात्त्विक व सात्त्विक क्रौर्य असते.

...मोकाशीना मुलाखतीसाठी काही प्रश्न सुचावेत म्हणून विचारात गढलो आणि प्रश्नाऐवजी काही उत्तरेच सुचत गेली. एकदम आश्चर्य वाटले. मोकाशीचे लेखन वाचता वाचता, मी मोकाशीचा मन कंद कधीपासून न्याहाळून पाहू लागलो होतो? माझा हा ध्यास, मलाच नकळत, कधीपासून कार्यरत होता? आश्चर्याचा छोटासा धक्काच मला बसला.

खरे म्हणजे मी व मोकाशी एकमेकांच्या जीवनात फार खोल घुसलेले वगैरे नव्हेत. त्याचे माझे जाणे-येणेही अगदी तुरळक, वर्षांतून एखाद्या वेळी होत असते. साहित्य-चर्चेच्या फडात आम्ही सतत एकत्र आहोत असेही नव्हे. त्यांच्या रेडिओदुरुस्तीच्या सुप्रसिद्ध दुकानातल्या सुप्रसिद्ध गप्पाष्टकांत कधी मी गेलेलो नाही. मग मला ही आंतरिक जवळीक कशी काय वाटते? मोकाशीचा गाभा समजला इत्यादी कसे जाणवते? हा सारा एक प्रकारचा भ्रम तर नाही?

पण नाही. हा भ्रम आहे असे मानायला माझे मन तयार होत नाही. त्यांच्या लेखनाचे सतत चिंतन माझ्या मनात चालू असते. त्यातून लेखक मोकाशींचे म्हणून जे व्यक्तित्व मला नेहमी भेटत राहिले तेच त्यांचे वास्तव व्यक्तिमत्त्व म्हणून मी गृहीत धरत असणार, असे एक समर्थन मन देऊ लागले.

तरी एक शंका राहिलीच. मला उमजलेल्या गाभ्याचाच स्पर्श मोकाशींच्या माझ्या वास्तव भेटीतही मला कसा होत राहिला ? की हाही एक हवे ते आहे असे मानण्याचा खेळ ?

अशा संभ्रमातच मी मुलाखतीसाठी गेलो. प्रश्न मनात तयार झाले नव्हतेच.....

वरच्या दालनात मोकाशी बसले होते. म्हणजे रेलून पहुडले होते. डोळ्यात नेहमीची खोडकर चमक कमी होती. तो अलिप्ततेने मनातल्या मनात चाललेला क्रीडारूप व्रात्यपणा नव्हता. खूप थकवा होता. दाट थकवा होता. माझे मन उदासले. हसून उत्साहाने मी दोन शब्द बोललो. उसन्या अवसानाने त्यांची खोडो काढण्याचाही प्रयत्न केला, पण मनातला उदासपणा कायम होता.

मुलाखत सुरू झाली.

मोकाशी नेहमीप्रमाणे पान्हा चोरू लागले. 'तुम्ही कथा लिहिता ? म्हणजे कसे कसे लिहिता ?' श्रीजंनी प्रश्न विचारला. 'तसं काही सांगता येणार नाही बुवा.' मोकाशींचे बंदिस्त उत्तर.

'तुम्ही दुसऱ्या कुठल्या लेखकांचे साहित्य वाचत नाही. असे का ?' वि. ग. कानिटकरांचा प्रश्न. त्यावरही उत्तर बंदिस्तच. म्हणाले, 'वाचत नाही असं नाही; पण ठरवून, पद्धतशीर वाचत नाही. शास्त्रीय; संशोधनपर, भूगोलाचे—खगोलाचे असे जास्त वाचतो.'

मला आतून काही तरी जाणवून मी प्रश्न केला, 'तुमच्या 'पालखी' पासूनच्या तिन्ही पुस्तकांत एक प्रकारची वैराग्यपरता दिसते; अलिप्तता जाणवते. तुम्हालाही ती जाणवते का ? 'आनंदओवरी' पर्यंत ती कशी कशी जाणवत गेली ?'

मला वाटते, या प्रश्नाने त्यांचे जिव्हार शोधले होते.

ते स्वतःच्या लेखनाऐवजी स्वतःवर बोलू लागले. सृष्टितत्त्वाचा शोध घेण्याची प्रेरणा लहानपणातील एका अनुभवाने कशी दिली, हे सांगू लागले. 'तुमची या अनुभवावर एक कथा आहे.', अशी अर्धवट आठवण मी काढल्यावर 'किंचित् बुद्ध' असे कथेचे नाव सांगून त्यांनी ती आठवण पुरी केली. मग ते बोलत राहिले. शांतपणाने, आत्मविश्वासाने बोलू लागले.

म्हणाले, 'ही धर्म, पंथ, राष्ट्र इत्यादि अडाणी मूल्ये सृष्टीच्या एकतेपुढे निरर्थक आहेत. आपण शास्त्रीय दृष्टीने निर्लेप विचार करून नैसर्गिक संपत्तीची नीट व्यवस्था लावली नाही तर सारी मानवजात धोक्यात येण्याचा संभव आहे हे आपण ओळखले पाहिजे.....'

मोकाशी या वेळी फार चांगले बोलले. 'तुम्ही माझा गबाळपणा म्हणजे खराच गबाळपणा समजू नका,' असे बजावून बोलले. सर्वांच्या समोर त्यांनी आपला अंतःकरणात साठवलेला धर्मविचार खुला केला. त्यांच्या नेहमीच्या विनोदी कोटिक्रमाला मुलाखतीच्या उत्तरार्धात भर आला. माइक धरणारा हात थकव्याने नकळत खाली येत होता. पाठीचा कणा लोडावर जरा जास्त आडवा होऊन विसावत होता. आवाज काही क्षणी आत ओढत होता; पण मोकाशींना आलेली आतली भरती सतत चढतीच होती.

माजगावकरांनी मुलाखत संपवली तेव्हा मनात समाधान होते. मोकाशींचा गाभा मोकाशींच्या मुखातून ऐकायला मिळाला होता. गेली तीन-चार वर्षे या गृहस्थाने मृत्यूशी डोळ्याला डोळा भिडवून जो अटीतटीचा सामना मांडला आहे तो कोणत्या कणखरपणाने हे उमगले.

परतताना मनात खात्री होती. मोकाशी हा सामना जिंकणार ! □

[पुण्यातील 'मॅजेस्टिक गप्पां'मध्ये ५ मे या दिवशी श्री. दि. बा. मोकाशी यांची प्रकट मुलाखत झाली. श्री. ज. जोशी, वि. ग. कानिटकर, श्री. ग. माजगावकर व प्रा. स. शि. भावे यांनी ही मुलाखत घेतली.]


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ कायदामंत्री शिवशंकर

इंदिराजीच्या मंत्रिमंडळामधील सहकाऱ्यांपैकी कुणाला फारसे असे स्वतःचे स्थान नाही. तरीही काही मंत्रिगण दैनिकाच्या पहिल्या पानाचे मानकरी असतात. कधी आसाममधील गुंतागुतीमुळे, तर कधी इंदिराजीसाठी राखून ठेवलेल्या विमानामध्ये हेतुतः बिघाड घडवून आणला गेल्यामुळे उठलेल्या वादळामुळे गृहमंत्री झैलसिंग यांची स्वारी सतत बातमीमध्ये चमकताना दिसते. सध्या बातमीमध्ये असलेले आणखी एक मंत्री म्हणजे कायदामंत्री शिवशंकर. तसे इंदिराजीचे आजवरचे सगळेच कायदामंत्री बातमीमध्ये होते. ज्येष्ठताक्रमाचा संकेत डावलून कै. कुमारमंगलम यानी सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती म्हणून सरकारी विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या न्यायमूर्तींना प्रमुख न्यायमूर्तीपद बहाल केले होते. इंदिराजीनी नुसती दिशा दाखवली तरी त्या दिशेने मागोवा घेऊन वाटचाल करत करत इंदिराजीना अभिप्रेत असलेल्या मुक्कामस्थळी घेऊन जाणारे कायदामंत्री म्हणून कै. हरिभाऊ गोखले यांनी नाव मिळवले होते आणि विद्यमान कायदामंत्री शिवशंकर हे सध्या न्यायमूर्तींच्या नेमणुका वगैरे करण्याच्या बाबतीत शासनाची वादातीत हुकमत सिद्ध करण्याच्या प्रयत्नात आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायमूर्तींना त्यांचे हे धोरण मान्य नाही. उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या नेमणुका आणि बदल्या याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायमूर्तींचा सल्ला आवश्यक आहे. शिवशकरही तसा सल्ला घेतात; पण पुढे पळवाट मात्र अशी काढतात की, सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती यांनी दिलेला सल्ला बंधनकारक नाही. लोकसभेमध्ये हे त्यांनी स्पष्ट केले आहे. शिवशंकर हे नाव सध्या बातमीमध्ये वारंवार पहावयास मिळत असले तरी त्यांच्याबद्दल फारशी माहिती आपल्याकडील वाचकांना नाही. मद्रासहून प्रसिद्ध होणाऱ्या 'हिन्दू' या इंग्रजी दैनिकाच्या रविवार आवृत्तीमध्ये या कायदाखाते संभाळणाऱ्या शिवशंकर याचा परिचय आलेला आहे.

श्री. एम. पी. शिवशंकर हे आंध्रप्रदेशामधील एक नामांकित वकील. विशेषतः युक्तिवाद करून आणि कायद्याचा कीस पाडून एखाद्या फसू पाहणाऱ्या केसचा बचाव करायचा असेल तर तो शिवशकर यानीच करावा असा त्याचा लौकिक. कोर्ट-कचेऱ्यामधील कामकाजामध्ये तीन तपे घालवल्याने कोर्टाच्या कामकाजाचा आणि कायदेकानूचा त्याचा अभ्यास दांडगा आहे. तीन तपे वकिली केल्यानंतर आंध्रप्रदेश उच्च न्यायालयात त्यांची नेमणूक झाली. राजकारणामधील अनुभवाचा विचार करायचा झाला तर मात्र ५२ वर्षांचे हे कायदामंत्री तसे नवखेच म्हणावे लागतील. दोन-चार वर्षांपूर्वी त्याना जर कोणी सांगितले असते की लवकरच तुम्ही केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये महत्त्वपूर्ण मंत्रिपद पटकवाल, तर असे सांगणाराला त्यानी वेड्यात काढले असते. अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही अनेक वेळा प्रत्यक्ष घडलेल्या आपण बघतोच की! पगार पुरत नाही म्हणून राजीनामा देणारे कै. हरिभाऊ तरी केंद्रीय मंत्रिमंडळामधील मंत्रिपद भूषवतील असे कोणाला वाटले होते? पण त्यानी मंत्रिपद भूषवले आणि आणीबाणीसत्रात बाईंची इमानेइतबारे सेवा करून आणि घटनेची मोडतोड करून त्यांनी बाईंना निवडणूक-खटल्यातून वाचवले! आज शिवशंकरही तितक्याच इमानेइतबारे सेवा करत आहेत. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना त्यांनी एक पत्र लिहिले आणि उच्च न्यायालयामधील अतिरिक्त न्यायमूर्तींकडून बदली स्वीकारण्यास संमती घ्यावी असे सुचवले. असे पत्र लिहून आपण सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या अधिकारक्षेत्रावर हमला करत आहोत हे न्यायालयात जिंदगी घालवणाऱ्या या न्यायमूर्तींना समजले नसेल असे नव्हे; पण असे करायचेच असे एकदा ठरवल्यावर या कायदेमंत्र्यांनी विश्वासू सेवकाप्रमाणे लगोलग पावले उचलली.

शिवशंकरजीचा इंदिरा काँग्रेसशी पहिला संपर्क आला तो चिकमंगळूर पोटनिवडणुकीच्या संदर्भात. इंदिराजीनी ही निवडणूक जिंकल्यानंतर एका मतदाराने खटला दाखल केला. त्या वेळी इंदिराजीचे वकीलपत्र शिवशंकर यानी घेतले आणि तो खटला न्यायालयात जिंकून दाखवला. शिवशंकर यांचा जीवनप्रवास तसा काही सीधासाधा नाही. ते आंध्रप्रदेशामधील असले तरी परिस्थिती-मुळे त्याना पंधरा ते वीस वर्षांहून अधिक काळ पंजाबमध्ये रहावे लागले. एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात त्याचा जन्म झाला. हैद्राबादमध्ये उर्दू माध्यमाच्या शाळेत त्यांचे शिक्षण झाले. पुढे काही कौटुंबिक आपत्ती आल्यामुळे त्याना अमृतसर येथे आपल्या एका नातेवाइकाकडे जावे लागले. काही विश्वस्त निधीकडून शिष्यवृत्त्या मिळवून त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले. अमृतसर येथील हिंदू महाविद्यालयात ते हुशार विद्यार्थी म्हणून ओळखले जात. याच महाविद्यालयातून इंग्रजी हा मुख्य विषय घेऊन त्यांनी पदवी संपादन केली. पदवी पदरात पडल्यावर त्यानी आंध्रप्रदेशात परत यायचे ठरवले. परिस्थिती मोठी अनुकूल होती असे नव्हे; परतु परत आपल्या मुलखात जाऊन नशीब अजमावून पहाण्यास ते उत्सुक होते. हैद्राबादला परत आल्यावर थोड्याशा प्रयत्नानंतर त्यांना हैद्राबाद नगरपालिकेमध्ये नोकरी मिळाली. ही नोकरी संभाळून त्यांनी कायद्याचे शिक्षण चालू ठेवले आणि १९५२ मध्ये कायद्याची पदवीही संपादन केली. आतापर्यंतच्या गोष्टी मनाप्रमाणे घडून आल्या होत्या. वकिलीमध्येही आपले नशीब अजमवून पहावे असा विचार करून त्यांनी नोकरीचा राजिनामा दिला आणि स्वतंत्र व्यवसायास सुरुवात केली. जात्याच हुशार असल्याने आणि कष्ट करण्याची तयारी असल्याने लवकरच या व्यवसायात त्याना नाव मिळाले आणि त्याचबरोबर इतर छोटे-मोठे मानमरातब चालत आले. हैद्राबादच्या मुलकी न्यायालयाच्या बार असोसिएशनचे ते चिटणीस बनले. व्यवसाय चालूच होता आणि त्याचबरोबर इतर जबाबदाऱ्याही हळूहळू वाढत होत्या. नामांकित वकील असा लौकिक संपादन केलेले शिवशंकर पंधरा वर्षात उच्च न्यायलयापर्यंत जाऊन पोचले आणि आंध्रप्रदेश बार कौन्सिलचे उपाध्यक्ष झाले. त्यानंतर वकील म्हणून त्यानी सरकारी नोकरी पत्करली आणि दरवर्षी बढती घेत केवळ तीन वर्षांच्या कालखंडात ते आंध्रप्रदेश सरकारचे प्रमुख वकील म्हणून नियुक्त केले गेले. आंध्रप्रदेश बार कौन्सिलच्या

विविध समित्यावर त्यांनी काम केले. ज्या वेळी आंध्रप्रदेश उच्च न्यायालयामध्ये काही अतिरिक्त न्यायमूर्तींच्या नेमणुका करण्याचे ठरले त्या वेळी अगदी सहजगत्या शिवशंकर याचे नाव पुढे आले. त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली. त्यानी न्यायमूर्ती म्हणून फार काळ काम केले नाही. केवळ आठच महिने ते या पदावर होते. तथापी या पदाचा राजिनामा दिल्यावरही वकील म्हणून त्यांचा न्यायालयाशी संबंध होताच. थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत त्यांचा वावर होता आणि आपल्या वकिली कौशल्याने अनेक महत्त्वपूर्ण खटले त्यांनी जिंकून दाखवले. वकिलीचा व्यवसाय करत असतानाच त्यांचा इंदिरा काँग्रेसशी संबंध आला आणि या पक्षानेच त्यांना राजकारणात ओढले. १९७९ मध्ये सिकंदराबाद मतदारसंघातील पोटनिवडणूक जिंकून त्यानी इंदिरा काँग्रेसचे खासदार म्हणून लोकसभेत प्रवेश केला. पुढे लगेच वर्षभरातच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी याच मतदारसंघातून त्यांना इंदिरा काँग्रेसचे तिकीट देण्यात आले आणि अधिक मोठा विजय संपादन करून ते पुन्हा लोकसभेत आले. इंदिराजींच्या मंत्रिमंडळामध्ये दुय्यम स्तरावर त्याचा समावेश होईल अशी अपेक्षा होती. त्या वेळी कायदामंत्रालयाच्या संदर्भात जगन्नाथ कौशल यांचे नाव घेतले जात होते. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांनी काम केले होते. खेरीज पुढे बिहारचे राज्यपालपद भूषविले होते आणि सार्वत्रिक निवडणुकीत इंदिरा काँग्रेसतर्फे निवडणूक लढवून ते चंडीगढमधून निवडून आले होते. कायदामंत्री म्हणून त्यांची निवड होईल असा अनेकांचा अंदाज होता; पण शिवशंकर यांनी चिकमंगळूर निवडणुकीतून निर्माण झालेल्या खटल्यात ज्या पद्धतीने काम केले होते त्यावर इंदिराजी खूष होत्या. कायदामंत्रालयासाठी अत्यंत तल्लख बुद्धीचा परंतु आपल्या सल्ल्याची लगोलग अंमलबजावणी करणारा विश्वासू सेवक त्यांना हवा होता. शिवशंकर याबाबतीत हरिभाऊ गोखल्यांच्या दोन पावले पुढेच जातील असा त्यांचा अंदाज होता आणि तो खराही ठरला. कायदामंत्री ज्या पद्धतीने काम करत आहेत त्यावरून न्यायालयाच्या संदर्भातही शासनाची हुकमत सिद्ध करण्याच्याच प्रयत्नात ते आहेत असे दिसते.

## □ तेलगू परिषद–एक प्रचंड गोंधळ

तेलगू भाषिकांतर्फे गेल्याच महिन्यात कुआलालंपूर येथे झालेली जागतिक तेलगू परिषद हा वास्तविक पाहता साहित्यिक संस्कृतिक स्वरूपाचा कार्यक्रम. भारतामधील एका प्रादेशिक भाषाप्रेमिकांनी जागतिक अधिवेशन भरवावे आणि तेही मलेशियामध्ये जाऊन भरवावे, ही तशी कौतुकाची बाब. एप्रिल १४ ते एप्रिल १८ पर्यंत झालेले हे अधिवेशन यशस्वी झाले असा दावा करण्यात येत असला तरी या परिषदेच्या व्यवस्थापन-संदर्भामध्ये प्रचंड गोधळ उडाल्याचे वृत्त असून, आध्रप्रदेश सरकारने या परिषदेसाठी दहा लाख रुपयाची रक्कम नेमकी कशासाठी खर्च केली, त्याबाबत जबाबदार मंडळीकडूनच विचारणा करण्यात येत आहे. अर्थात सांस्कृतिक कारणासाठी शासकीय रक्कम खर्च झाल्याने सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघानीही या संधीचा लाभ घेतला. सर्वच पक्षाचे नेते सरकारी खर्चाने या परिषदेसाठी जाऊन आल्याने परिषद यशस्वी झाली असा डागोरा राजकीय नेत्यांकडून पिटला जात आहे. मुख्यमंत्री टी. अंजय्या, तसेच पी. सुदरय्या (डावे कम्युनिस्ट) एस. जयपाल रेड्डी, (जनता) आणि श्री. व्यंकट नायडू (भाजप) या साऱ्या मंडळीनी परिषदेवर स्तुतिसुमनांची उधळण केली आहे अर्थात व्यवस्थापनाबाबत इतका गोंधळ उडाला होता की, त्याबाबत परिषदेची तारीफ करणाऱ्या या मंडळीनाही हातचे राखूनच बोलावे लागले.

परिषदेला जाणाराची आयत्या वेळी इतकी गर्दी उडाली की, अनेक मान्यवर साहित्यिक, कलाकार याना मद्रास येथे अडकून पडावे लागले आणि सरकारी मेहमान म्हणून अनेक मंडळी मलेशियाचा दौरा करून आली. यातील कित्येकाचा तर या तेलगू परिषदेशी दूरान्वयानेही संबंध नव्हता. मिळतोय फुकट दौरा, घ्या संधी साधून, अशा वृत्तीने मंडळी जाऊन आली. तेलगू साहित्य संघाने या प्रकाराबाबत, विशेषतः अनेक मान्यवराची जी फरफट झाली त्याबद्दल तीव्र निषेध नोदवला आहे. ज्या मंडळीना या परिषदेसाठी जावयाची संधी मिळाली त्याची व्यवस्था मोठी उत्तम होती अशातला भाग नाही. ज्यांनी परिषदेच्या कामकाजात प्रत्यक्ष भाग घेतला अशांपैकी किती तरी मंडळीना सिंगापूर येथे विमानतळाच्या व्हरांड्यात झोपण्याची वेळ आली. या सर्व बेजबाबदार व्यवस्थापनाची जबाबदारी प्रामुख्याने 'ट्रॅव्हल इंटर नॅशनल' या प्रवासी-कंपनीवर टाकण्यात येत आहे. आध्रप्रदेश विधानसभेमध्ये या प्रकारावर चागली तीन तास चर्चा झाली. सरकारतर्फे या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री अंजय्या, सास्कृतिक खात्याचे मंत्री बी. श्रीराम मूर्ती व गृहमंत्री के. प्रभाकर रेड्डी या तिघांनीही या प्रकारास ट्रॅव्हल इंटर नॅशनल जबाबदार असल्याचे ठासून सागितले. मग प्रश्न असा निर्माण होतो की, या कंपनीला हे एवढे मोठे काँट्रॅक्ट दिले कोणी ? विशेषतः ही कंपनी मान्यताप्राप्त नाही हे माहीत असूनही या एकाच कंपनीवर एवढी मोठी जबाबदारी का टाकण्यात आली ? आपल्या असंख्य निमंत्रितांनीही परदेशामध्ये जो गोधळ घातला त्यामुळे देशाची प्रतिमा निश्चितच डागळली गेली आणि तरीही केवळ थातुरमातुर खुलासा स्वीकारून हे प्रकरण का मिटवण्यात येत आहे ?

या परिषदेसाठी ९३६ निमंत्रितानी हजेरी लावली. त्यापैकी ८०० व्यक्तीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ट्रॅव्हल इंटर नॅशनलकडे होती. या कंपनीचा या प्रकरणी दोष असेलही; पण केवळ त्यांच्याकडे बोट दाखवून राज्यशासनासह इतर संबधिताना या प्रकरणातून सुटता येणार नाही असा टीकाकारांचा दावा आहे. टीकाकार केवळ ओरड करून थाबले नाहीत तर या प्रकाराची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे अशी मागणी त्यानी केली. आलेला अनुभव इतका कडवट होता की, मुख्यमंत्र्यानी न्यायालयीन चौकशीची मागणी नाकारली असली तरी राज्याच्या वाहतूकखात्याचे चिटणीस दिलसुखराम याना या साऱ्या प्रकाराची चौकशी करून अहवाल सादर करण्यास सागितले आहे.

पहिली तेलगू परिषद १९७५ मध्ये हैद्राबाद येथे झाली. त्याच वेळी मलेशियाहून १६ प्रतिनिधीचे शिष्टमंडळ आले होते. त्याच वेळी दुसरी परिषद मलेशिया येथे भरवावी असे आमंत्रण या प्रतिनिधिमंडळाने दिले. १९७८ सालीच वास्तविक ही दुसरी जागतिक तेलगू परिषद व्हायची; परंतु त्या वेळचे मुख्यमंत्री डॉ. चेन्ना रेड्डी यानी अर्थसाहाय्य नाकारले. पुढे टी. अंजय्या मुख्यमंत्री झाल्यावर परिषदेची तयारी करण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष श्री. बी. गोपाळ रेड्डी यानी मुख्यमंत्र्याची भेट घेतली. अंजय्या यानी एकदम उदार दृष्टिकोन स्वीकारला. बी. गोपाळ रेड्डी यानी असे सुचवले की, राज्यशासनाने पाच लाख रुपयाचे अनुदान द्यावे व उरलेले पाच लाख रुपये समितीने उभे करावेत. अंजय्या म्हणाले, हूं ! दहा लाखाचाच प्रश्न आहे ना, देऊन टाकू. त्याप्रमाणे अनुदान दिले गेले. इंटर नॅशनल तेलगू इन्स्टिट्यूट या संस्थेने भाषापंडित, साहित्यिक, पत्रकार, प्रकाशक आदी मंडळीची यादी तयार केली. शासन ज्या

३५० व्यक्तीचा खर्च करणार होते त्यामध्ये या मंडळीचा समावेश झाल्याने राजकारणी रागावले. अंजय्या यांच्यावर स्वपक्षीयानीच टीका सुरू केली. राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती असताना, दहा लाखाचे अनुदान कशासाठी ? यासारखे प्रश्न विचारण्यात आले. अंजय्या या प्रकाराने नाराज झाले. त्यानी सारे प्रकरण मंत्रिमंडळासमोर ठेवून रीतसर मंजुरी घेतली. खर्च सरकार करणार असल्याने निमंत्रित म्हणून कोणाला बोलवावे हे ठरवण्यासाठी सरकारी समिती नेमली गेली. इंटर नॅशनल तेलगू इन्स्टिटयूटने केलेली मूळ यादी बाजूलाच राहिली. अंजय्यानी विरोधी पक्षीयाना बोलावून घेतले आणि सरकारी खर्चाने विदेशदौरा होण्याचे चिन्ह दिसताच प्रारंभी कडवटपणे बोलणारे विरोधकही या परिषदेला जाण्याला तयार झाले.

व्यवस्थापनाची जबाबदारी कंत्राटीपद्धतीने द्यावी असे ठरले. त्याप्रमाणे रीतसर दरपत्रके मागवण्यात आली. ३० प्रवासी कंपन्यानी दरपत्रके भरली. सर्वसाधारणपणे 'मद्रास ते कुआललंपूर व तीन दिवसाच्या वास्तव्यानंतर परत' अशा दौऱ्यास माणशी सहा हजार दोनशे रुपये खर्च येतो. तथापी बंगलोर येथील ट्रॅव्हल इंटर नॅशनलने तीन हजार सहाशे रुपयात निमंत्रिताना नेल्या-आणण्याची जबाबदारी उचलण्याची तयारी दाखवली. खेरीज मलेशियामधील वाहनव्यवस्था, निवासव्यवस्था, नाश्ता व भोजनखर्च यासाठी दरडोई ६०० डॉलर्स द्यावेत असेही ठरले. मान्यता प्राप्त नसूनही या कंपनीकडे वरील अटीवर व्यवस्थापन देण्यात आले. तेलगू परिषदेबद्दल खरे प्रेम असणारी मंडळी काही थोडी नव्हती; पण ती राहिली बाजूला आणि सरकारी कृपाप्रसादाने अनेक मंडळींची वर्णी लागली. त्यामुळे अनेक मंडळी नाराज झाली. दहा एप्रिलपर्यंत यादी पक्की नव्हती. ११ एप्रिलला दुसरा शनिवार व १२ एप्रिलला रविवार. त्यामुळे आपले नाव आहे की नाही याचाही कित्येकांना पत्ता नव्हता. त्यात इंदिरा काँग्रेसने आपल्या पक्षाच्या ४० सदस्यांना पाठविण्याचे ठरविले आणि ४० मंडळीचा हा ताफा मद्रासमध्ये येऊन दाखल झाला. आपल्याला प्राधान्य द्यावे असे त्यांनी सुचविले. यादीमध्ये आपले नाव आहे तेव्हा सर्व काही सुरळीत होईल म्हणून निश्चित असणारी मंडळीही हादरून गेली. या आंतरराष्ट्रीय तेलगू परिषदेचे अध्यक्ष एम. व्यंकटकृष्ण राव याच्यावर दडपण आणण्यात आले आणि प्रवाशांची यादी निश्चित करून, त्याची जवळजवळ बळजबरीने सही घेण्यात आली. या यादीमध्ये अर्थातच इंदिरा काँग्रेसच्या ४० मंडळीचा समावेश होता. वास्तविक ज्यांना सन्मानपूर्वक बोलाविले होते असे नटराज रामकृष्ण, शंकरशास्त्री आणि एम. सत्यनारायण यासारखी मंडळी बाजूला राहिली. या यादीवर सही करावी म्हणून कृष्णराव याना कोंडून ठेवण्यात आले आणि त्यांच्याशी कमालीच्या दांडगाईचे वर्तन करण्यात आले आणि या साऱ्या प्रकारामुळे चिडून जाऊन तेलगू परिषदेचे अध्यक्ष असलेले व्यंकटकृष्ण राव यांनी आपला दौरा रद्द केला.

निमंत्रिताची निवड करण्याबाबत आणि व्यवस्थापनाबाबत जो गोंधळ उडाला त्याचे पडसाद परिषद चालू असतानाही उमटले. या मंडळीकडे परदेशामध्ये काही केवळ तेलगू भाषिक म्हणून पाहिले जात नाही. एकदा तुम्ही देशाबाहेर पाऊल टाकले की तुम्ही संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करता. त्यामुळे परदेशात या मंडळीची जी फसगत झाली त्याचा विपरीत परिणाम होऊ नये म्हणून आपल्या वकिलातीमधील मंडळीना या प्रकरणात लक्ष घालावे लागले. वकिलातीमधील मंडळींनी यथाशक्ती सहाय्य करून परिषदेसाठी जमलेल्या तेलगू भाषिकाची परत भारतात पाठवणी केली असली तरी, ज्या पद्धतीने परिषदेचे कामकाज चालविले गेले आणि निमंत्रितांची निवड केली गेली आणि अनाहुतांची संख्या वाढू देण्यात आली, त्याबाबत मलेशियामधील भारतीय वकिलातीने राज्य सरकारकडे निषेध नोंदवला असून, यापुढे अशा कार्यक्रमाचे संयोजन करताना केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे तसेच परराष्ट्र खात्याचे सहाय्य घ्यावे असे सुचवले आहे. केंद्र सरकारलाही या परिषदेचा अहवाल वकिलातीमार्फत पाठवण्यात आला असून केंद्र सरकारने आंध्र प्रदेश सरकारकडे या प्रकरणी नाराजी व्यक्त केली आहे. केंद्रातही इंदिराजी आणि आंध्रातही इंदिराजी असल्यामुळे याबाबत यापेक्षा जास्त काही घडण्यासारखे नव्हतेच !!

## □ काळ्या पैशासाठी सफेद रोखे !

काळा पैसा बाहेर निघावा म्हणून केंद्र सरकारने गेल्या जानेवारीमध्ये धारकाला प्रमाण मानणारे रोखे विक्रीसाठी काढले होते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये सुमारे २०० कोटी रुपयाचे व चालू आर्थिक वर्षामध्ये म्हणजे १ एप्रिलनतर ३० एप्रिल रोजी मुदत संपण्यापूर्वी आणखी ८०० कोटी रुपयाचे रोखे विकले जातील आणि साधारणपणे एक हजार कोटी रुपये सरकारी तिजोरीमध्ये जमा होतील अशी अपेक्षा होती. काळ्या पैशाच्या राशी जमवणारी मंडळी अशा प्रलोभनाना सरळ सामोरी जात नसतात. त्यामुळे अर्थमंत्र्यानी वेळोवेळी धमक्या दिल्या. आयकर खात्यामार्फत घालण्यात येत असलेल्या धाडीचे प्रमाण वाढवण्यात आले. रोखे विक्रीला काढण्यापासून एक महिना झाल्यावर केवळ ८.२४ कोटी रुपयाचे रोखे विकले गेले होते. तेव्हा या प्रकरणी सरकार केवळ रोखे काढून स्वस्थ बसणार नाही, हेही संबंधिताच्या लक्षात आणून देण्यासाठी धाडी वाढवण्यात आल्या. १५ जानेवारी ते १५ मार्च या तीन महिन्याच्या कालखंडामध्ये आयकर खात्याने एकूण ५०४ धाडी घातल्या. त्यापैकी मुंबईमध्ये सर्वांत जास्त म्हणजे २७५ धाडी घालण्यात आल्या. खेरीज कलकत्ता ६०, दिल्ली ५२, कानपूर ६३, अहमदाबाद ३२ आणि मद्रास २२ असे अन्य शहराचे प्रमाण होते. या धाडीमुळे ३०३.८६ लाख रुपयाची दडवलेली मलमत्ता उजेडात आली. केवळ मुंबईमधून जवळजवळ एक कोटी रुपयाची बेहिशेबी मालमत्ता उजेडात आली. या धाडी जरी गुप्तपणे घातल्या जात असल्या तरी ज्याच्यावर या धाडी घातल्या गेल्या त्यानी आपल्या बाधवाना जागे केले आणि रोखे खरेदी करण्याचा सल्ला दिला. अर्थात असे जरी घडले असले आणि रोखे खरेदी करण्यासाठी संबधितांची जरी थोडी–फार गर्दी उडाली असली तरी सरकारला जेवढा अपेक्षित होता तेवढा पैसा काही या रोख्यातून उभा राहू शकला नाही. शेवटच्या दोन दिवसात रोखे खरेदी करणारांची खूप गर्दी वाढल्यामुळे अपेक्षित असलेले एक हजार कोटी रुपये जमा होतील अशा बातम्याही होत्या; परंतु हे केवळ अंदाज होते. हाती आलेली अखेरची आकडेवारी फारशी उत्साहवर्धक नाही. ३० एप्रिलपर्यंत म्हणजेच घोषित मुदतीच्या अखेरच्या दिवसापर्यंत केवळ ३५० कोटी रुपयाच्या आसपास रोख्यांची विक्री झालेली आहे. याचाच अर्थ असा की, अर्थमंत्र्यांनी अंदाजपत्रकाच्या वेळी जेवढी रक्कम जमा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती त्याच्या केवळ १/३ रक्कम प्रत्यक्षात जमा झाली आहे. रोखे खरेदी करण्याची मुदत कदाचित वाढवून दिली जाईल, परंतु तेवढयाने फारसे काही साध्य होणार नाही. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी आपल्याजवळ आणखी काही जालीम उपाय आहेत असे अर्थमंत्री म्हणतात. तसे ते खरोखर आहेत का आणि असले तरी त्याची खरोखरच अंमलबजावणी होणार आहे काय ? हा खरा प्रश्न आहे. 'काळा पैसा' हा आर्थिक आघाडीवरील एक भेडसावणारा प्रश्न असून अर्थमंत्री हा प्रश्न सोडवण्यासाठी आता कोणती नवीन तोड काढतात याकडे काळा पैसा दडवून ठेवणाऱ्यासह सर्वांचे लक्ष लागले आहे ! □

## भूगोल शिकवणारा हा प्राध्यापक....दहा हजार स्त्री-कामगारांचा नेता कसा काय झाला ?....

लेखक : विजय परुळकर । लेखांक : दुसरा

कर्नाटकच्या गुंडूराव सरकारनं ६ एप्रिल १९८१ रोजी निपाणी येथे गोळीबार करून कैक शेतकरी मारले, अनेक शेतकरी अपंग आणि जखमी केले. ह्या गोळीबाराच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी हासन येथे रयत संघटनेनं मोर्चा काढला. तिथंही गुंडूरावांच्या पोलिसांनी गोळीबार करून तीन शेतकरी जीवे मारले. ह्याचा अर्थ असा होतो की, इथून पुढं शेतकऱ्यांनी आपल्या न्याय्य मागण्या मांडल्या की सरकार तत्परतनं त्यांना बंदुकीच्या गोळीनेच उत्तर देणार !

शेतकरी आज जो लढा उभा करतोय तो कुठलीही राजवट किंवा सत्ता उलथून पाडायच्या हेतूनं नव्हे! शेतकरी फक्त आपल्या घामाचा दाम मागताय, मजुरीचं माल मागतोय, आपल्या शेतमालाचा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव मागतोय. थोडक्यात सांगायचं झाल्यास तो फक्त पोटभर भाकरी मागतोय आणि तीदेखील फुकट किंवा भीक म्हणून नव्हे,तर घामाच्या बदल्यात हक्क म्हणून ! शेतकऱ्यांचं आंदोलन राजकीय नसून आर्थिक आहे.

एखादा राजकीय विरोधी पक्ष जेव्हा एखाद्या प्रश्नावर मोर्चे काढतो, निदर्शने करतो तेव्हा राजकीय पुढाऱ्यांना आणि राजकीय निदर्शकांना अटक करण्यात येते, फोटो वगैरे काढून झाल्यावर संध्याकाळी सोडून देण्यात येतं; पण शेतकरी संघटना जेव्हा संपूर्णपणे पक्षविरहित असं शांततापूर्ण आंदोलन उभं करते तेव्हा मात्र सरकार बेछूट गोळीबार करून आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न करतं. नेत्यांना आणि शेतकरी सत्याग्रहींना खुनाचा प्रयत्न करणं, दरोडा घालणे, जाळपोळ करणे इत्यादी आरोपाखाली अटक करून बारा बारा, चौदा चौदा दिवस तुरुगात डांबतं – हे असं का घडतं ?

कांदा-ऊस आंदोलनात श्रीगोंद्याला गोळीबार झाला आणि एक शेतकरी हुतात्मा झाला. खेरवाडीच्या गोळीबारात तिघांचे बळी गेले. निपाणीला तंबाखू आंदोलनात तेरा आणि हासन येथ तीन शेतकरी पोलिसांनी झाडलेल्या गोळ्यांचे भक्ष्य बनले ! हजारो शेतकरी एस. आर. पी. च्या लाठ्या आणि नाल लावलेल्या बुटांच्या लाथा खाऊन जखमी झाले– हे सगळं काय चालल आहे ? भारतीय शेतकऱ्याला आपल्या घामाचा दाम मागण्याचं देखील स्वातंत्र्य नाही असा निष्कर्ष काढायचा ठरवल तर ते चूक आहे का ?

◻

नासिक आंदोलनानंतर डिसेंबर–जानेवारी महिन्याच्या सुमारास शरद जोशींच्याबरोबर मराठवाड्याचा दौरा करत असताना पुण्यातील एका स्वयंसेवी संस्थेच्या संचालकाचा मला निरोप मिळाला– 'निपाणी येथील देवदासींच्या मुलींसाठी एक वसतीगृह बांधण्यात यावं अशी तेथील कार्यकर्त्यांची विनंती आहे. त्या संदर्भात प्राथमिक पहाणी करून तुझं मत कळवशील का ?'– स्वयंसेवी संस्थेच्या संचालकाला मी होकार कळवला आणि पुण्याला परतताच निपाणीच्या दौऱ्याची तयारी केली. तत्पूर्वी देवदासींच्या प्रश्नावर पोटतिडीकेनं काम करणारी एक चुणचुणीत कार्यकर्ती, संध्या हरदास–सुभाष जोशींची मेहुणी, मला आणि सरोजाला भेटून गेली.

जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात मी निपाणीला गेलो. माझ्याबरोबर पुण्यातील एक 'समाजकार्यकर्त्या' होत्या आणि प्रदीप दीक्षित हा तरूण फिल्ममेकरदेखील आला होता. निपाणीला गेलो ते सरळ प्राध्यापक सुभाष जोशींच्या घरीच. निपाणीतील नेहरू चौकापासून जोशी गल्लीत शिरून सुभाष जोशींचं घर हुडकून काढायचं म्हणजे चक्रव्यूव्ह भेदण्याइतकाच कठीण प्रकार ! फरक इतकाच की ह्या चक्रव्यूहात अडकल्यानंतर कुणालाही विचारलं 'सुभाष जोशींचं घर कुठ ?' की ताबडतोब उत्तर–इथून डाव्या हाताला वळा मग पुन्हा डाव्या हाताला, पुन्हा उजव्या हाताला, मग एकदा डाव्या हाताला वळून पुन्हा उजवीकड जाऊन डाव्या बाजूला ...' बरंच गोल गोल फिरून भोवळ येणार असं वाटत असतानाच एकदम सुभाष जोशींचं घर आलं. सुभाष जोशींच्या पत्नी सुनीताअक्का आणि संध्यानं प्रसन्न स्वागत केलं. 'सर' अजून कॉलेजमधून आले नव्हते.

चहाचा पहिला कप येण्यापूर्वीच पुण्यातील सामाजिक कार्यकर्तीनं जमलेल्या देवदासी भगिनींचा ताबा घेतला आणि भराभर त्यांच्या उद्धाराच्या आणि मुक्तीच्या वेगवेगळ्या योजना मांडायला सुरुवात केली. मुक्ती योजनाच्या प्रचंड माऱ्यानं बिचाऱ्या देवदासी भांबावून गेल्या. पोटमाळ्यावर जायच्या लाकडी जिन्याच्या पायरीवर बसून मी गंमत बघत राहिलो. ज्या उत्साहानं आणि झपाट्यान पुण्याच्या बाई उद्धार-योजना मांडत होत्या त्यावरून अर्ध्या-पाऊण तासात त्यांची दमछाक होणार हे निश्चित ! त्यांची लांबलचक रकानं संपली की मग आहिस्ता आहिस्ता आपण बोलायला सुरुवात करायची असं मी ठरवलं.

◻

देवदासीचा प्रश्न मला तसा अजिबात नवीन नव्हता. माझं जन्मगाव बेळगाव आणि सगळं प्राथमिक शिक्षण कानडीतून अथणी, बैलहोंगल, धारवाड, हुबळी ह्याच परिसरात झालेलं. लहानपणी आईबरोबर सौदत्तीच्या यल्लमाच्या यात्रेला मी अनेक वेळा गेलेलो. माझी धाकटी बहीण गीता ही यल्लमाला केलेल्या नवसामुळे जगली अशी आईची तेव्हा श्रद्धा. त्यामुळ पहिली तीन वर्षं तिनं गीताला मागून आणलेले जुने कपडे घालून वाढवलं. ही माझी बहीण डॉक्टर झाली आहे आणि बेळगावला असते. तिच्या सासरी अजूनही नवरात्राच्या आठव्या दिवशी सुपामध्ये मुगाची खिचडी, वडे, खीर, गहू, तेल, कादा, वागं, नारळ वगैरे नैवेद्य ठेवून 'उदो उदो' म्हणत देवीची 'पडली' भरण्याची प्रथा आहे. बेळगावमधील अनेक घरंदाज कुटुंबामध्ये अशी प्रथा आहे. अशा कुटुबातील शिकल्या-सवरलेल्या स्त्रिया अजूनही वर्षातून एकदा तरी पाच घरी जोगवा मागतात. हा केवळ अंधश्रद्धेचा प्रश्न नसून भावनेचा आहे. त्यामुळं झटपट उद्धार किंवा धडक मुक्ती योजना आखून हा प्रश्न कधीच सुटणार नाही.

पुण्यातील कार्यकर्त्या बाईंबद्दलचा माझा सुरुवातीचा अंदाज खरा ठरला. अर्ध्या तासातच त्या दमल्या आणि सुभाष जोशींच्या घरी उष्मा फार होतो असं निमित्त करून विश्राती घेण्यासाठी त्या एका व्यापाऱ्याच्या बंगल्यावर राहाण्याकरता म्हणून निघून गेल्या. आलेल्या देवदासी देखील 'जेवणं करून माघारी येतो' म्हणून निरोप घेत्या झाल्या. मी सुनीताआक्का आणि संध्याबरोबर गप्पा मारत बसलो. गप्पा मारताना एक विशेष आनंद मिळत होता त्याला कारण दोघींच्या बोलण्यातील खास बेळगावी हेल !

माझ्या मायबोलीत देखील मूळचा हाच हेल कि होऽऽ! होय की होऽऽ! कानावर एकदा हा हेल पडला बघा आणि मनावरचं दडपण-गिडपण सगळं सोडून सोडले बघा ! इथं आता परकं-गिरकं वाटायचा प्रश्नच नाही कि होऽऽ! होऽऽय हो! एकदम घरच वाटलं बघा !

सुनीताअक्काबरोबर बोलताना एक गोष्ट चटकन् जाणवली. ही आक्का तशी दिसायला काटकुळी असली तरी तेजस्विनी आहे. प्रखर स्वाभिमानी, निर्भीड आणि करारी असूनही अंत.करणानं उदार आणि मनानं अतिशय प्रेमळ आहे. स्वयंपाकघरातील काम झटपट उरकत सुनीताआक्का निपाणीतील व्यापारी, पोलीस, सरकारी अधिकारी ह्यांच्या एकाहून एक नमुनेदार कथा ऐकवत होत्या. बोलताना अक्काच्या रागाचा पारा अचानक चढायचा, व्यापारी, पोलीस ह्यांनी केलेल्या अत्याचाराच्या आठवणीनं त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला भिडायची आणि मग जे शब्द साडायचे त्यांची धार विलक्षण असायची. संध्या हरदासचा नमुनाही तोच. अक्काची ही सख्खी बहीण. अक्का गोरीपान, तर संध्या काळी-सावळी !

दुपारी दोनच्या सुमारास 'सर' म्हणजे सुभाष जोशी आले. शिडशिडित बांधा. खांदे वर उचलून धरायची सवय. त्यामुळे पाठीत किंचित पोक. अनेक महिने कात्रीशी गाठ न पडलेले अस्ताव्यस्त केस. भेदक डोळे. चेहरा प्रथमदर्शनी काहीसा उग्र भासावा असा !

घरात शिरताच अनेक दिवसांची ओळख असावी त्याप्रमाणे प्रसन्न हसत 'सर' म्हणाले, 'विजयराव, तुमच्या योद्धा शेतकरीनं आमच्या भागातील कार्यकर्त्यांना वेड लावलंय- त्या सर्वांना तुम्हाला भेटायचं आहे-'

¤

दिवसभर सुभाष जोशी अतिशय गडबडीत होते. पुण्यातील बाईंना देवदासींची एक सभा भरवून हवी होती, त्यासाठी गडहिंग्लज वगैरे परिसरातून हजार-पाचशे देवदासी सुभाष जोशींनी जमा कराव्यात अशी त्यांची अपेक्षा होती. ह्या बाई मग देवदासींसमोर भाषण करून पुणे येथे एक 'देवदासी मुक्तिवाहिनी' स्थापन करण्यात येत असल्याचे जाहीर करणार होत्या. सुभाष जोशींना 'मित्र मानणाऱ्या एका पुणेकराची चिठ्ठी घेऊन बाई आल्या असल्यामुळं सरांची पंचाईत झाली होती. सुभाष जोशी वैतागून म्हणत होते-' ह्या पुण्या-मुंबईच्या लोकांचा नसता ताप असतो. ह्यांचं काम कमी, पण लिहिणं आणि भाषणंच जास्त ! ...'

सकाळी सुनीताअक्का आणि संध्याबरोबर मनमोकळी चर्चा करताना अनेक गोष्टी माझ्या ध्यानात आल्या होत्या. निपाणीमध्ये देवदासींचे प्रश्न, विडी आणि तंबाखू कामगार-स्त्रियांच्या समस्या सोडविण्यात प्राध्यापक सुभाष जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना काही प्रमाणात यश मिळू लागलंय हे पहाताच मार्क्सवादी, डावे, उजवे वगैरे पुढारी ह्या भागात घिरट्या घालू लागले. त्यांच्या-पाठोपाठ काही समाजवादी मंडळी आणि तथाकथित समाजकार्य-कर्त्यांनी ह्या भागाला चार-दोन भेटी देऊन पुण्या-मुंबईत भाषणं ठोकण्यास सुरुवात केली. पुण्या-मुंबईत आपल्या सभा गाजाव्यात म्हणून इकडच्या चार-दोन देवदासींना ही समाजकार्यकर्ती मंडळी बोलवून घेऊन, त्यांचा 'शो पीस' सारखा उपयोग करू लागली. निपाणी परिसरातील ह्या गांजलेल्या स्त्रियांच्या पदरात मात्र प्रत्यक्षात काहीच पडलं नाही. ह्या पुढाऱ्यांच्या आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या 'सामाजिक बांधिलकीचा, समाजाभिमुख आणि पुरोगामी विचारसरणीचा' मात्र उदो उदो झाला. जनतेच्या दारिद्र्याच्या मढ्यावर चरणारी जशी सरकारी अर्थशास्त्रज्ञ आणि योजनाकारांची एक जात आहे तशीच सामाजिक प्रश्नांचं भांडवल करून स्वत:ची तुंबडी भरून घेणाऱ्या समाजकार्यकर्त्यांचीदेखील एक फार मोठी जमात आहे.

प्राध्यापक सुभाष जोशी पुण्याच्या बाईंसाठी आवश्यक त्या कार्यक्रमाची आखणी करत असताना मी इतर कार्यकर्ते आणि देवदासी भगिनींबरोबर मुलींच्या वसतिगृहाबद्दल, त्यातील संभाव्य अडचणींत, जागेचा प्रश्न, पैशाचा प्रश्न, व्यवस्थापनाचा प्रश्न वगैरेसंबंधी साधक-बाधक चर्चा करून माहिती जमवू लागलो. वसतिगृहाचा प्रश्न केवळ इमारत बांधून सुटण्याइतका साधा नव्हता. संध्याकाळी उशीरापर्यंत अनेकांशी चर्चा करून काही प्राथमिक अंदाज बांधण्या-इतपत माहिती मला मिळाली.

रात्री साडेसात-आठच्या सुमारास मी आंघोळ करून ताजातवाना झालो. एक व्हिस्कीचा पेग जमवला आणि देवदासींच्या मुलींच्या वसतिगृहाच्या संदर्भातील प्राथमिक अहवालाच्या 'नोटस्' लिहीत बसलो. मी दुसरा पेग जमवत असतानाच सुभाष जोशी आले. त्यांच्याबरोबर आय. एन. बेग, गनी पटेल, नाईक आणि भाई घारिया होते. सर्व मंडळींना 'योद्धा शेतकरी' बद्दल चर्चा करायची

होती. भाई धारियांनी तंबाखूच्या उत्पादनखर्चाची संपूर्ण आकडेवारी तयार करून इतर आवश्यक ती माहिती जमवून एक फाइल तयार केली होती. ही फाईल मी शरद जोशींना द्यावी आणि निपाणीतील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांतर्फे ह्या परिसरात एखादी सभा घेण्याचं आमंत्रण द्यावं अशी इच्छा जमलेल्या मंडळींनी व्यक्त केली. मी फाइल आणि आमंत्रण पोहचवतो असं आश्वासन दिल्यावर मंडळी गेली आणि मी सुभाष जोशींबरोबर बोलत बसलो.

दिवसभर निपाणीतील तंबाखू आणि विडी कामगार स्त्रिया आणि देवदासी भगिनींच्याकडून 'सरां'च्या विषयी जे ऐकायला मिळत होतं त्यातून ह्या प्राध्यापकाविषयी माझ्या मनात जबरदस्त कुतूहल निर्माण झालं होतं. भूगोल विषय शिकवणारा हा प्राध्यापक ह्या परिसरातील देवदासींचा प्रवक्ता आणि दहा हजार कामगार स्त्रियांचा नेता कसा काय झाला ?

¤

श्री. राजा ढाले, नामदेव ढसाळ ही मंडळी एकत्र होती तेव्हाची गोष्ट ! अतिशय 'मिलिटंट' अशी ह्या सर्व तरुणांची त्या काळी प्रसिद्धी. नामदेव ढसाळाच्या कविता सर्वत्र गाजत होत्या. विशेषत: धरणीला आई आणि आकाशाला बाप मानून लिहिलेली एक कविता अनेकांच्या मनाला भिडली होती. 'एक तीळ असला तरी तो आपण सर्वांनी मिळून करवंडून खावा' ह्या विचारसरणीनं सुभाष जोशी झपाटला गेला. नामदेव ढसाळांना निपाणीला आणायचं असं त्यानं ठरवलं. ह्या कामात आपल्याबरोबरच्या तरुण दलित प्राध्यापकांनी पुढाकार घ्यावा अशा तऱ्हेची योजना सुभाष जोशीनं आखली.

नामदेव ढसाळाच्या सभेचं अध्यक्षपद एका दलित प्राध्यापकांनी भूषवायचं आणि सभेचं प्रास्ताविकदेखील एका दलित प्राध्यपकानीच करायचं असा कार्यक्रम ठरला. सभेच्या ऐनवेळेला मात्र अध्यक्ष होणारे दलित प्राध्यापक आणि प्रास्ताविक करणारे दलित प्राध्यापक दोघेही गैरहजर राहिले. दुसरं कुणीच अध्यक्षपद स्वीकारण्यास पुढं येईना तेव्हा सुभाष जोशीनं अध्यक्षपद स्वीकारलं आणि प्राध्यापक नरेंद्र कुकडेंनी प्रास्ताविक केलं.

दुसऱ्याच दिवशी सुभाष जोशीला नोटीस मिळाली– 'तुम्ही अशैक्षणिक कामामध्ये गुतले असल्यामुळे तुमच्या सेवेबद्दल गंभीर विचार करावा लागेल. कारणे दाखवा !'

ह्या प्रसंगापूर्वी निपाणीमधील ब्राह्मण प्राध्यापकांनी ब्राह्मणांची संघटना तयार केली पाहिजे असा आग्रह धरला होता. ही संघटना कशासाठी ?— तर बाकीच्या सगळ्या जातीमध्ये मयतीसाठी भरपूर माणसं उपलब्ध असतात; पण ब्राह्मणाच्यामध्ये माणसं मिळत नाहीत, बोलावून आणावी लागतात ! संघटना झाली तर हा प्रश्न सुटेल, मयतीला भरपूर गर्दी जमविता येईल, म्हणून ब्राह्मणांनी एकत्र आलं पाहिजे असं ह्या प्राध्यापक मंडळीचं म्हणणं होतं. सुभाष जोशी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी ह्या ब्राह्मण प्राध्यापकांच्याविरुद्ध एक पत्रक काढलं होतं. त्यामुळं हा मंडळी अगोदरच चिडली होती. नामदेव ढसाळाच्या सभेचं निमित्त करून ह्या मंडळींनी देवचंद शेठजीचे कान फुंकले आणि सुभाष जोशींना नोटीस पाठविण्याची व्यवस्था केली.

टॉमी नदाफ नावाचा सुभाष जोशींचा एक मित्र होता. १९७१ साली बंगला देशचं युद्ध सुरू झालं तेव्हा नदाफनं एक कविता लिहिली. तिच्यात 'कुराणावर हात ठेवणारे हे लोक दुसऱ्या हाती तलवार घेऊन इस्लामचा प्रचार करतात' असा एक संदर्भ होता. निपाणीतील काही मुसलमान मंडळींनी नदाफला वाळीत टाकायचं ठरवलं. सुभाष जोशीनं नदाफला पाठिंबा व्यक्त करणारं पत्रक काढलं.

सुभाष जोशीचे हे सर्व उद्योग बघून एक दिवस देवचंद शेठजींनी त्याला बोलवून घेतलं आणि ते म्हणाले, 'तू निपाणीचा म्हणून आम्ही तुला कॉलेजात घेतलं; पण तू शिकवायचं सोडून ह्या जातीविषयी, त्या धर्माविषयी पत्रक काढत असतोस हे काही बरोबर नाही. तुझ्या ××××× काय दात फुटलेत काय ?' नामदेव ढसाळांच्या सभेनंतर शेठजी भडकलेच आणि त्यांनी सुभाष जोशी आणि प्राध्यापक कुकडेना मेमो पाठवला.

ह्या दोघांनी त्या मेमोला असं सणसणीत उत्तर पाठवलं की जवाब नाही ! देवचंदशेठजींनी बापजन्मात इतका सडेतोड जवाब ऐकला नसेल ! मेमोला मिळालेलं उत्तर वाचून त्यांची झोपच उडाली असणार !

सुभाष जोशी आणि प्राध्यापक कुकडेंनी पाठविलेल्या उत्तराला देवचंदशेठजींनी प्रतिउत्तर पाठवलं. ह्या दोघांनी पुन्हा सणसणीत आणि सडेतोड जवाब पाठवला तेव्हा शेठजींनी विद्यापीठाकडे तक्रार केली की, हे दोन प्राध्यापक अशैक्षणिक कामामध्ये गुतलेले असतात, ह्यांचं शिकविण्याकडे लक्ष नाही, सबब ह्यांना नोकरीवरून काढण्याची परवानगी द्यावी.

दोघांनी आपलं पाच वर्षांचं रेकॉर्ड, विद्यार्थ्यांचे रिझल्टस् विद्यापीठाला दाखविले आणि विचारलं, 'आमचा हलगर्जीपणा कुठं झाला आहे तो दाखवा !' त्याचबरोबर कॉलेजच्या प्राचार्यांचं एक पत्रही जोडलं, प्राचार्यांनी स्पष्टपणे लिहिलं होतं, 'कॉलेजमध्ये ह्या प्राध्यापकांनी आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली आहे. त्या व्यतिरिक्त आपल्या खासगी वेळेमध्ये हे काय करतात त्याच्याशी कॉलेजचा संबंध नाही !'

दोघांचं कॉलेजमधील शिकविण्याचं रेकॉर्ड आणि प्राचार्यांचं पत्र ह्यामुळं देवचंदशेठजींची अडचण झाली. मग त्यांनी कोल्हापूरच्या पर्ल हॉटेलमध्ये एक पत्रकार परिषद घेतली. तिथं पत्रकारांच्या खाण्या–पिण्याची उत्तम व्यवस्था तर होतीच; त्याउप्पर शेठजींनी प्रत्येक पत्रकाराला नगद एक हजार रुपये असलेलं पाकीट दिलं. अनेक पत्रकारांनी अर्थातच शेठजींची बाजू घेतली; पण वासुदेव कुलकर्णी, श्रीपाद देशपांडे, बाळ देशपांडे या काही जणांनी मात्र शेठजींना छेडलं.

देवचंदशेठजींना तंबाखूचा व्यापार माहीत. पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरं देण्याची सवय कमीच ! शेठजी म्हणाले– 'सुभाष

**ह्या प्राध्यापक देवदासींचा प्रवक्ता व कामगार-स्त्रियांचा नेता कसा झाला ?**

जोशी आणि कुकडे ह्यानी दलित पँथरच्या सभेत भाग घेतल्याबद्दलचा आक्षेप आम्ही मागे घेतला आहे आणि त्याना आता फक्त अशैक्षणिक कामात वेळ घालविण्याच्या कारणावरून आम्ही कॉलेजमधून काढून टाकलं आहे !'

दुसऱ्या दिवशी ही बातमी छापून येताच कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी संप केला. विद्यार्थ्यांचं म्हणणं होतं की, ह्या प्राध्यापकाचं काम तर उत्तम आहे. मग त्याना नोकरीवरून का काढलं ? दहा दिवस कॉलेज बंद राहिलं.

दरम्यान दलित पँथरच्या तरुणानी संपूर्ण कोल्हापुरात 'जोशी-कुकडे झिंदाबाद, देवचंद शहा मुर्दाबाद' आणि 'जोशी-कुकडेंना न्याय मिळालाच पाहिजे' अशा घोषणा लिहिल्या.

त्याच सुमारास देवचंदशेठजी साखर कारखान्याच्या एका प्रकरणात सापडले. दलित पँथरच्या तरुणानी त्यांच्या गुन्ह्याची नोंद करणारा एक मोठा फलक कोल्हापुरातील हॉटेल सह्याद्रीसमोर मांडून ठेवला आणि मग मात्र देवचंदशेठजीचं मनोधैर्य खचू लागलं.

देवचंदशेठ बिथरले हे लक्षात येताच निपाणीतील सर्व तंबाखू व्यापारी एकदम एकत्र आले. त्यानी ठरवलं की, एकीकडे देवचंदशेठजीना फूस लावायची आणि सागायचं, 'काही घाबरू नका. कॉलेज तुमचंच आहे. नोकरीवरनं तुम्ही ह्याना केव्हाही काढू शकता. ह्यांना हाकलून लावा ! ही पोरं तुमचं काय वाकडं करणार आहेत ? आपोआप नरम येतील !' आणि दुसरीकडं हे व्यापारी आपआपसात म्हणायचे 'ह्या प्रकरणात शेठजीचा परस्पर काटा काढता येणार आहे – ही संधी वाया घालवून उपयोगी नाही !' ह्या सर्व उलाढालीमुळे देवचंदशेठजी बरेच खचले आणि गांगरले !

सुभाष जोशी आणि कुकडेंना मग शेठजीच्या सेक्रेटरीमार्फत एक पत्र आलं, त्यात लिहिलं होतं 'सर्व आक्षेप मागे घेत आहोत, आक्षेप घेतल्याबद्दल दिलगिरी–'

ह्या प्रकरणानंतर देवचंदशेठजीनी ह्या दोन प्राध्यापकांना हात लावायचा पुन्हा प्रयत्न केला नाही.

देवचंद शेठजीनी नाद सोडला असं लक्षात येताच सुभाष जोशी आणि त्याच्या सहकाऱ्यानी त्या गोष्टीचा फायदा उठवायचा निर्णय घेतला आणि तंबाखू उत्पादक शेतकरी आणि तंबाखू विडी कामगार स्त्रियाची संघटना बांधण्याचा जोरदार कार्यक्रम हाती घेतला. १९७३ सालची ही घटना.

जे व्यापारी देवचंद शहांविषयी पूर्वीपासून मनामध्ये डूक धरून होते, ह्या देवचंद शहा आपल्याला नेहमी कुत्र्याप्रमाणे वागवतो म्हणून राग धरून होते, ते सर्व ही संधी साधून त्यांच्यापासून फुटले. त्यानी एक स्वतंत्र गट स्थापन केला आणि देवचंद शहाना बाजूला सारून ही सर्व मंडळी इंदिरा कॉंग्रेसमध्ये शिरली. ह्यामध्ये निपाणीतील मराठा व्यापाऱ्यानी पुढाकार घेतला. तेव्हापासून निपाणीमधील तंबाखू व्यापाऱ्यात उघडउघड असे दोन गट पडले. अर्थात दोन गट फक्त राजकारणापुरते, व्यवहारात पैशाचा प्रश्न आला की त्याची एकी पूर्ववत असायची.

ह्या सुमारास '३० नंबर' ही सुप्रसिद्ध विडी बनविणाऱ्या कारखान्यात संप झाला. मालकाने वाटाघाटी न करता कारखानाच बंद करण्याचा निर्णय जाहीर केला. त्या कारखान्यात काम करणाऱ्या काही स्त्रिया आणि त्याची मुलं सुभाष जोशीला भेटायला आली. ही कामगार मंडळी दलित वस्तीमध्ये रहाणारी. सुभाष जोशीनं त्याचं म्हणणं ऐकून घेतलं; पण मार्ग काय काढावा हे त्याला सुचेना. लेबर ऑफिसर, लेबर कमिशनर नावाचं काही तरी अस्तित्वात असतं ही साधी गोष्टदेखील त्या वेळी सुभाषला माहीत नव्हती. कामगार संघटनेच्या कामाचा अनुभव तर नव्हताच, अभ्यासदेखील नव्हता. कुठल्याही राजकीय पक्षाशी कसलाही संबंध नव्हता; पण ह्या कामगार स्त्रिया आणि त्याची मुलं तर गाऱ्हाणं मांडून बसलेली ! त्यांना सांगायचं काय ?

सुभाष विचारात अडकला असतानाच दलित वस्तीमधील ह्या कामगाराव्यतिरिक्त केरळ वगैरे अन्य प्रातांतून निपाणीमध्ये उपजीविकेसाठी, विड्या वळण्यासाठी आलेली कामगार मंडळी आपलं गाऱ्हाणं ऐकविण्यासाठी म्हणून आली. केरळमधील ह्या मलबारी कामगारांच्या रक्तातच युनियनिझमची आच ! त्याच्यापैकी एकानं आग्रह केला की निपाणीमध्ये विडी कामगाराची युनियन स्थापन केल्याशिवाय पर्याय नाही. ह्या मालकाच्याविरुद्ध संघटितपणे लढा द्यायचा असेल तर कामगाराची युनियन करावीच लागणार !

सुभाष जोशीनं कामगाराची युनियन बांधण्याचा निर्णय घेतला. वास्तविक कॉलेजच्या नोकरीच्या भानगडीतून तो नुकताच बाहेर पडला होता. तरीदेखील कामगाराच्या एकजुटीच्या प्रश्नात उडी घेण्याचं त्यानं ठरवलं. त्यानं कामगाराची सभा घेतली. सभेनं निर्णय घेतला की सर्वांनी जाऊन मालकाच्या दारात बसायचं. मालक जोपर्यंत माघार घेत नाही तोपर्यंत उठायचं नाही !

सर्व कामगार स्त्रियाना घेऊन सुभाष जोशी मालकाच्या दारासमोर जाऊन बसला. त्याला वाटलं, मालक लगेच घाबरून वाटाघाटीला तयार होईल; पण एक दिवस झाला, दोन दिवस झाले, मालक काही दाद देईना. धरणं धरून बसलेल्या कामगार स्त्रियाच्या अन्नाचा, भुकेचा प्रश्न निर्माण झाला. सुभाषनं काही तरुण कार्यकर्त्यांच्या हातामध्ये टोपल्या दिल्या आणि त्याना सांगितलं, 'गावात दारोदार जाऊन भाकऱ्या मागा !'

निपाणीतील नागरिकांनी उदार हातानं भाकरी वाढली. भुकेचा प्रश्न मिटला. सतत आठ दिवस कार्यकर्ते भाकऱ्या गोळा करून कामगार स्त्रियाच्या भुकेचा प्रश्न सोडवीत होते. अखेर मालक वाटाघाटीला तयार झाला !

पण वाटाघाटी करायच्या म्हणजे निश्चित काय करायचं, काय मागायचं ह्या कशाचीच सुभाषला कल्पना नव्हती. समजा नुकसानभरपाई द्यायच मालकानं मान्य केलं; पण नुकसानभरपाई मागायची किती हे कुणा लेकाला माहीत ! वाटाघाटी सुरू झाल्या तेव्हा सुभाष ताठर भूमिका घेत म्हणाला, 'प्रत्येक कामगार स्त्रीला शंभर रुपये नुकसानभरपाई म्हणून दे !' त्याला वाटलं शंभर रुपये हा आकडा एकून मालक गांगरणार. वाटाघाटी करा म्हणणार, कुरबूर करणार. त्यानं फारच कुरबूर केली तर पंचाहत्तर रुपये नुकसानभरपाईवर तडजोड करायची असं सुभाष मनाशी ठरवत असतानाच मालक शंभर रुपये द्यायला चटकन् तयार झाला. ताबडतोब देऊन टाकतो म्हणाला !

निपाणीमध्ये पूर्वी १९४८ साली कम्युनिस्टांची एक युनियन होती. त्यानंतर मोहन घारियांची एक युनियन होती. असं काही तरी झालं तर मालकलोक तडजोडीसाठी ठरलेले पैसे युनियन लीडरच्या हाती ठेवत आणि म्हणत, 'कामगारांना किती वाटायचे ते तुमचं तुम्ही ठरवा!' तडजोडीबद्दल लीडरचं कमिशन वेगळं अगोदरच ठरलेलं असायचं. ह्या रिवाजाला धरूनच हा मालक सुभाष जोशीला म्हणाला, 'मी तुमच्याकडे शभर रुपयाप्रमाणे पैसे देतो. किती वाटायचं ते तुमचं तुम्ही ठरवा आणि तुमचं कमिशन काय ते पण सांगून टाका. ताबडतोब देतो!'

सुभाष जोशी म्हणाला, 'हे चालणार नाही. तुम्ही स्वतः आलं पाहिजे आणि सर्वांसमक्ष पैसे वाटले पाहिजेत!' हा प्रकार कामगारांना तर नवीन होताच; पण मालकालादेखील नवीन होता. त्यानं शेवटी कमिशनबद्दल विचारलं तर हा बहाद्दर म्हणाला, 'माझं कसलं कमिशन? मी नोकरी करतो. मला पगार मिळतो. माझं व्यवस्थित आहे!'

सुभाष जोशीचा पूर्वेतिहास ऐकताना मी भान हरवून बसलो होतो. स्वयपाकघरातून सुनीताअक्काची हाक ऐकू आली आणि भानावर आलो. सुनीताअक्का नवऱ्याला म्हणत होती,

'अहो, ते पुण्याहून आलेत आणि दिवसभर इकडंतिकडं भटकत आणि बडबडत बसलेत. त्यांना भूक लागली असेल! जेवून घ्या आणि मग बसा बोलत. रात्र खूप शिल्लक आहे!'

आळस झटकत स्वतःशीच हसत आणि बायकोला उद्देशून 'अग, आलो आलो—ओरडू नकोस!', असं सांगत सुभाष जोशी मला उद्देशून म्हणाले, 'विजयराव चला, तुम्हाला कंटाळा आला असेल हे सगळं ऐकून!'

मी काहीच न बोलता व्हिस्कीचा ग्लास संपविण्याच्या इराद्यानं ओठाला लावला तेव्हा 'सर' म्हणाले—'ग्लास बरोबर घेतलात तरी हरकत नाही—' आणि आम्ही स्वयंपाकघरामध्ये जाऊन चुलीशेजारी मांडलेल्या पाटावर बसलो.

¤

अनेक वर्षांनंतर स्वयंपाकघरामध्ये चुलीसमोर पाट मांडून जेवायला बसायचा प्रसंग! हा घरगुती अनुभव लहानपणी घेतला असेल तेवढाच. नंतर स्वयंपाकघर म्हणजे ओटा, उभ्यानं स्वयंपाक आणि जेवायचं डायनिंग टेबलवर! सुभाष जोशीच्या गृहस्थीधर्माचं, घराच्या घरपणाचं रहस्य ह्या स्वयंपाकघरात कुठं तरी असावं. चुलीच्या ठिकाणी बरशेनची शेगडी असली तरी शेणानं सारवलेल्या जमिनीवर पाटावर मांडी घालून स्वच्छ ताटामध्ये सुनीताअक्का ह्या अन्नपूर्णेनं वाढलेले रुचकर पदार्थ खाताना 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' ह्याची आठवण होणं साहजिक होतं. काकडीची कोशिंबीर, वांग्याची मसालेदार भाजी, शेंगदाण्यांची चटणी, झुणका, वरण, ताज ताक, गरम गरम भाकरीवर लिंबाएवढा लोण्याचा गोळा आणि सुनीताअक्काचा आग्रह!

मांडीवर लाडानं येऊन बसलेल्या मांजरीला गोंजारत 'सर' संध्याला पुण्याच्या बाईच्या कार्यक्रमाविषयी काही प्रश्न विचारत होते. संध्या काहीशी वैतागून उत्तरं देत होती. पुण्याच्या बाईचा बहुतेक तिला उबग आला असावा असं तिच्या चेहऱ्यावरून वाटत होतं. सुनीताअक्कानं तोंडातल्या तोंडात 'काय बाई का सोग!' असं पुटपुटून तव्यावरची भाकरी परतली तेव्हा मी विचारलं,

'अक्का, तुमचा नवरा धाडसी आहे. ह्याच्याबरोबर संसार करणं कठीण! सरांची नोकरी गेली तेव्हा तुम्हाला काळजी वाटली असणार ना?'

'काळजी वाटून आणि घाबरून काय उपयोग?' पोळपाटावर भाकरी थापत अक्का म्हणाली—'पण खोटं कशाला सांगू? ह्यांची नोकरी जाणार म्हणून मला तेव्हा काळजी वाटली...ह्याचा सगळा पगार एकशेपस्तीस रुपये होता तेव्हा; पण मी तेवढ्यात सगळं भागवून न्यायचे. दोन मुलं—पण अडचण व्हायची नाही! नोकरी जाणार म्हणताना आकाशच कोसळल्यासारखं वाटलं. खूप त्रास करून घेतला. डोकीचे केस पांढरे झाले. तेव्हा माझे आई-वडील मला म्हणाले, 'तुझा नवरा जे करतोय ते चांगलं काम आहे, त्याच्याशी भांडू नको, त्याच्या कामात मदत कर!' तेव्हापासून मी मन घट्ट केलं आणि त्याच्याबरोबर उभी राहिले. आता मला कुणाचीच भीती वाटत नाही. कसलीही काळजी वाटत नाही—ह्या कामगार बायाचे हाल बघितले म्हणजे मग स्वतःच्या त्रासाचं काहीच वाटेनासं होतं. परवा ह्याचा एक डॉक्टरमित्र म्हणाला, वहिनी, तुम्हाला एक औषध देतो—केस पुन्हा काळे होतील. मी म्हटलं केस काळे करून आता कुठं मिरवायला जाऊ—काय करायचंय फॅशनी करून?'

'अग, काय तरी काय सांगतेस त्यांना—भाकरी वाढ बघू!' सर अक्काची चेष्टा करत म्हणाले.

'*त्यांना खोटं सांगून मला काय करायचंय?*' म्हणत अक्कानं माझ्या पानात भाकरी आणि हा एवढा मला लोण्याचा गोळा टाकला. ह्या घरी चार दिवस जेवलो तर चार किलो वजन वाढणार ह्या भीतीनं मी हैराण झालो. गयावया करून अक्काला म्हणालो,

'कृपा करून आग्रह करू नका. मी हवं ते मागून घेतो—अजिबात न लाजता; पण तुम्ही आग्रह करू नका!'

¤

जेवण आटोपल्यावर तंबाखूचं एक मस्त पान जमवलं आणि सराच्याबरोबर रात्रीची 'गस्त' घालायला बाहेर पडलो. हवेत बराच गारठा होता. वेळ रात्री साडेअकराची. सर झपझप चालत तंबाखूची एकएक वखार तपासत होते. रात्रपाळी सुटायची वेळ झाली होती. वखारीतील कामगारस्त्रियांना मुकादम वेळेवर सोडतात की नाही ह्याची सर पाहणी करत होते. पूर्वी कामगारस्त्रियांना पहाटे दोन-अडीचपर्यंत सोडायचे नाहीत. सुटी झाल्यावर ह्या स्त्रिया धावत-पळत चार-पाच मैलांवरील खेड्यातील आपलं घर गाठायच्या. तासाभरात भाकरी टाकून, अंघोळी करून, मुलाबाळांचं काय जमेल तेवढं करून पुन्हा हातावर भाकरी घेऊन ती

**या कामगार-बायांचे हाल बघितले म्हणजे मग स्वतःच्या त्रासाचं काहीच वाटेनासं होतं!**

पळत पळत खात सकाळी नऊच्या आत कामावर हजर व्हायच्या ! एक मिनिट उशीर झाला तरी काम नाही. खाडा ! रोजगार नाही. उपासमारीची वेळ अशी हृयाची परिस्थिती. त्यात युनियन झाल्यापासून आता थोडीफार सुधारणा.

'सगळ्या वखारीचा राउंड संपवून आम्ही घराकडे परतू लागलो तेव्हा मी विचारलं, ' सर, पहिला संप तुम्ही कामगाराना शंभर रुपये नुकसानभरपाई देऊन मिटवलात. त्यानतर पुढं काय झालं ?'

सुभाष जोशी सांगू लागले,

' वाटाघाटीचा तो पहिलाच अनुभव. त्यामुळं नुकसानभरपाई किती मागायची हे तेव्हा माहीतच नव्हतं. कामगारानं वर्षभर काम केलं असेल तर मालकानं पधरा दिवसांचा पगार दिला पाहिजे, ग्रॅच्युटी दिली पाहिजे हे तेव्हा काहीच माहीत नव्हतं. हा संप जेव्हा मिटला तेव्हा निपाणीमधील इतर कामगारस्त्रियादेखील विचार करू लागल्या. कम्युनिस्टाची एक युनियन अस्तित्वात होतीच. ते म्हणाले, आमच्या युनियनमध्ये या ! मी म्हटलं येतो, जरूर पडल्यास तुम्हाला सल्लादेखील देतो. त्या युनियनचा मग मी सेक्रेटरी झालो. युनियनचा अध्यक्ष होता हुबळीला. त्याची-माझी गेल्या पाच-दहा वर्षांत गाठभेटदेखील नाही ! अजूनही आमच्या युनियनचा तोच अध्यक्ष आहे. आम्ही काही त्याला बदलला नाही. तो इकडे येत नाही आणि आम्ही तिकडे जात नाही !

' युनियनचं काम हळूहळू वाढत गेलं. विडी कामगाराचे दोन-तीन लढे झाले. दोन-तीन वेळा मला उपोषणाला बसावं लागलं. बोनस म्हणजे काय हे या कामगाराना माहीत नव्हतं. १९७५ साली आम्ही बोनसचा लढा दिला, उपोषणानंतर बोनस कामगारांच्या पदरात पडला. निपाणीमध्ये मिळालेला हा पहिला बोनस, हा बोनसदेखील मालकानी कामगाराच्या समक्ष स्वत: वाटला. ही प्रथा नवीन होती.

' त्यानंतर मग मालकांनी त्रास द्यायला सुरुवात केली. त्यांनी विडी कामगारांना विडीचं पान कमी द्यायला सुरुवात केली. त्या सुमारास मी लेबर लॉचा अभ्यास सुरू केला. विडी-उत्पादनाच्यामागचं अर्थशास्त्र जाणून घेऊ लागलो. हे समजावून घेत असताना माझ्या घ्यानात आलं की तंबाखू उत्पादक शेतकऱ्यावर तर प्रचंड अन्याय होतोय !

' काटा सूट, बारदान सूट, हवा सूट, काडीमाती सूट, गाडीसूट, असल्या रिवाजाच्या नावाखाली शेतकऱ्याचा अनेक किलो तंबाखू फुकट लुटायचा. त्याला अखेरीस किलोला चार किंवा पाच रुपये भाव द्यायचा. तिथंदेखील शेकडा सूट वगैरे कपाती करायच्या, पैसे कधीच रोख आणि वेळेवर द्यायचे नाहीत आणि मग स्वस्त दरात लुटलेला हा तंबाखू साधी प्रक्रिया करून, गुजराथच्या हलक्या दराच्या तंबाखूत मिसळून विडी-कारखानदाराना पंधरा-सोळा रुपये किलो दरानं विकायचा! हा प्रकार पाहिल्यानंतर सर्वांत प्रथम तंबाखू उत्पादक शेतकऱ्याला संघटित करणं आवश्यक आहे हृयाची जाणीव झाली. '

हे काटासूट, गाडीसूट वगैरे काय प्रकार असतो म्हणून मी सुभाष जोशीना विचारलं. त्यावरून सुटीच्या नावाखाली चाललेला लुटीचा हा प्रकार माझ्या ध्यानात आला तो असा—

अगदी काल-परवापर्यंत हृया भागातील तंबाखूखरेदीचा व्यवहार किलोवर न चालता मणाच्या हिशोबाने होत असे. हा मणदेखील प्रत्येक गावचा वेगवेगळा. एका गावचा मण अठरा किलोचा, तर त्याच्या शेजारच्या गावी सोळा किलोचा. म्हणजे लुटीची सुरुवात मणापासून !

तंबाखूची पानं खुडल्यानंतर, उन्हामध्ये वाळवून चांगली सुकल्यानंतर, दोन पोती एकत्र जोडलेल्या बारदानातून माल साठवला जातो. हृयाला 'बोद' म्हणतात. एक बोद साधारणपणे पन्नास ते साठ किलो वजनाचं असतं. तंबाखूची खरेदी सुरू होण्यापूर्वी व्यापाऱ्याचे एजंट नमूने नेण्यासाठी येतात. नमुना म्हणून ते एका बोदातील दीड-दोन किलो तंबाखू काढून त्याचा पुडा बाधून नेतात. विक्रीच्या वेळेला पुन्हा एकदा दीड-दोन किलो तंबाखू नमुना म्हणून घेतला जातो. म्हणजे चार-पाच एजंट येऊन नमुना घेऊन गेले म्हणजे पहिल्या झटक्यालाच दहा-बारा किलो तंबाखू फुकटचा जातो.

बोदाचं वजन करताना सर्वांत प्रथम काटासूट धरली जाते. जगातील कुठलाच काटा बरोबर वजन दाखवणार नाही म्हणून बोदामागे एक किलो वजन 'काटासूट' म्हणून कमी धरायचं. त्यानंतर 'बारदानसूट' म्हणजे प्रत्यक्ष पोत्याच्या वजनाची सूट. ती कपात कधी दोन किलो तर कधी पाच किलोसुद्धा धरली जाते. त्यानंतर नमुना पाहून तंबाखूमध्ये काडीमाती किती हे ठरवलं जातं. तंबाखू कितीही स्वच्छ असला तरी बोदामागे तीन चार किलो ' काडीमाती सूट ' धरलीच जाते. वास्तविक तंबाखूच्या पानाची काडी ही विडीचा जर्दा बनविण्यासाठी अत्यंत आवश्यक. हृया काडीची पूड करून जर्दात मिसळल्याशिवाय विडी पेटत नाही. तरी देखील हृया काडीची सूट धरली जाते; पण विडीकारखानदारालामात्र ही काडी घालूनच तंबाखू विकला जातो. मग ' गाडीसूट ' म्हणजे तंबाखू गाडीतून गोदामात नेताना सांडणार म्हणून दोन किलो कपात ! सर्वांत कहर म्हणजे ' हवासूट ! ' बोदाचं वजन ( ? ) करून झाल्यावर एजंट ते हातानं दाबून बघतो आणि म्हणतो ' सगळं पोकळ भरलंयस. नुसती हवा आहे ! म्हणून हवासूट दोन किलो ! '

वजनाच्या वेळी हृया सगळ्या सुटी लावून पन्नास किलोच्या एका बोदामागे सहज पंधरा-वीस किलो लुटण्यात येतात. त्यानंतर 'लाभसूट' म्हणून एक प्रकार आहे आणि शेकडा सूट म्हणून रकमेत वर दहा टक्के कपात आणि एंट्री टॅक्स आणि मार्केट सेस जो व्यापाऱ्यांनी भरायचा तोदेखील शेतकऱ्याकडून वसूल करण्यात येतो. हृया सगळ्या कपाती झाल्यानंतर समजा रक्कम झाली रु. ३८९०।– तर वरील आठशे नव्वद रुपये कापून घेऊन शेतकऱ्याला दिले जातात तीन हजार रुपये. तेसुद्धा कधीही रोख किंवा एकरकमी मिळत नाहीत. असा हा प्रकार पिढ्यानपिढ्या चालू आहे. रिवाजाच्या नावाखाली शेतकऱ्याला कसं लुटलं जातं हे ऐकून मी चक्रावून गेलो. सुभाष जोशी पुढं सांगत होते—

' अकोळमधील तंबाखूउत्पादक शेतकरी, त्याच्यामध्ये काही

माझे विद्यार्थीदेखील आहेत, त्यांनी एक तरुण मंडळ स्थापन केलं आणि हे रिवाज मोडायचे असं ठरवलं. त्यासाठी अकोळमध्ये एक सभा भरवली. अशा सभेतून भाषण करायचं म्हणजे व्यापाऱ्यांना भरपूर शिव्या द्यायच्या एवढंच आम्हाला तेव्हा माहीत. त्याप्रमाणे जोरदार भाषणं करून आम्ही व्यापारी, दलालांना भरपूर शिव्या दिल्या आणि वेगवेगळ्या सुटीच्या नावाखाली लुटायचे अन्यायकारक रिवाज मोडायचे असं आमचं आम्हीच एकमतानं ठरवून टाकलं.

'आम्ही तरुण लोकांनी रिवाज मोडायचं ठरवलं खरं; पण आम्हाला साथ द्यायला कुणीच शेतकरी पुढं येईना. शेतकऱ्याच्या मनात व्यापाऱ्यांविषयी जबरदस्त भीती होती. त्यामुळं रिवाज मोडण्यासाठी पुढं यावयास कुणीच धजावेना. त्याचा परिणाम असा झाला की ज्या चार पाच तरुण शेतकऱ्यांनी सभेमध्ये व्यापाऱ्यांना शिव्या देणारी भाषणं करून रिवाज मोडायची प्रतिज्ञा केली त्या चार-पाच जणांचा तंबाखू तसाच पडून राहिला. इतर शेतकऱ्यांचा तंबाखू व्यापारी नेहमीच्या पद्धतीने खरेदी करून घेऊन गेले. अकोळमधील तरुण मंडळाचा तंबाखू लढ्याचा पहिलाच प्रयत्न संपूर्णपणे बारगळला तरी त्याचा इतर शेतकऱ्यांवर आवश्यक तो परिणाम झालाच. शेतकरी विचार करू लागले आणि १९७६ च्या सुमारास तंबाखूउत्पादक शेतकऱ्यांची संघटना बऱ्यापैकी आकार धारण करू लागली. त्या संघटनेला आम्ही नाव दिलं 'निपाणी विभाग-तंबाखू उत्पादक शेतकरी मंडळ' हे मंडळ स्थापन करण्यासाठी आम्ही पाच-सहा कार्यकर्त्यांनी सुटीच्या दिवशी सायकली घेऊन एरवी संध्याकाळी पायी चालत जाऊन खूप खेडी पालथी घातली.

'आणीबाणीचा तो काळ. आंदोलन तर उभं करता येत नव्हतं; पण गावोगाव फिरून आम्ही ज्या सभा घेत होतो त्यावरून स्पष्ट जाणवत होतं की शेतकऱ्यांच्या जागृतीचा काळ दूर नाही. हा शेतकरी संघटित होणार!

'आणीबाणी संपली आणि आम्ही शेतकऱ्यांचा लढा हाती घेतला. तंबाखू शेतकऱ्याला आम्ही सांगितलं की, जोपर्यंत तुम्ही रस्त्यावर येत नाही तोपर्यंत तुमच्या तंबाखूला रास्त भाव कधीही मिळणार नाही! घरी बसून राहिलात तर दरवर्षी तुम्ही दरामध्ये मारच खात जाणार! ज्या वर्षी आम्ही आंदोलन सुरू केलं त्याच वर्षी तंबाखूचे दर मुद्दाम पाडण्यात आले. पाच-सहा रुपयानं जात असलेला तंबाखू एकदम आठ आणे, बारा आणे किलो इतका खाली घसरला. दर पाडण्यात व्यापाऱ्यांचा निश्चित हात असावा असा संशय घ्यायला भरपूर वाव आहे.

'दर पडल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. व्यापाऱ्यांनी त्या वर्षी जाहीर केलं—आमच्याकडे भरपूर तंबाखू साठलेला आहे, आणखी दोन वर्षे तंबाखूची गरज नाही. शेतकऱ्यांनी आपला तंबाखू शेतामध्ये खत म्हणून गाडून टाकावा, असंही व्यापाऱ्यांनी सुचवलं.

'त्या काळात आंदोलन करायचं म्हणजे नक्की काय करायचं हे देखील आम्हाला माहीत नव्हतं. आंदोलन करायचं म्हणजे घोषणा द्यायच्या, निषेध व्यक्त करायचा, पत्रकं काढायची, उपोषण करायचं किंवा रस्ता अडवायचा ह्यापलीकडे काहीच कल्पना नव्हती. आम्ही पुणे–बंगलूर रस्ता अडवायचं ठरवलं!

'दोन-तीन तास आम्ही रस्ता अडवला. इतक्यात आम्हा सगळ्या आघाडीच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडून नेलं आणि रस्ता लगेच मोकळा केला!

'ह्या रस्ता-रोकोचा खेळ दोन–तीन तासातच जरी खलास झाला तरी त्याचा बराचसा परिणाम झाला. पाच–सहा हजार तंबाखू उत्पादक शेतकरी एकत्र येऊन रस्ता अडवतात ह्या गोष्टीची वर्तमानपत्रातून दखल घेण्यात आली. तंबाखू शेतकरी तंबाखूला भाव मागत आहे ही बातमी पंचक्रोशीत पसरली. सरकारचं ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधलं गेलं. सरकारनं आम्हाला वाटाघाटी करण्यासाठी दिल्लीला बोलवलं. आमच्यासाठी विमानाची तिकिटं पाठविली. आम्ही खूष!

'मंत्रिपदावर असलेले मोहन धारिया निपाणीचेच. तेव्हा वाटाघाटी यशस्वी होणार ह्याबद्दल आमची खात्री होती. दिल्लीला पोहचताच आम्ही मोहनभाईंना फोन केला. ते म्हणाले, तुम्ही काही काळजी करू नका. तुम्ही प्रश्न मांडण्याचीदेखील गरज नाही. मी सर्व अभ्यास केला आहे. मी स्वतःच जातीनं त्यात लक्ष घालतो आहे. मी सर्व तयारी केली आहे. कॅबिनेटला सांगितलं आहे, मोरारजीभाईंना सांगितलं आहे, पटेलांना सांगितलं आहे. आता फक्त तुमचा प्रश्न मी मांडायचा अवकाश की समस्या सुटलीच म्हणून समजा! मोहन धारियांनी असं सांगितल्यावर आम्ही हरखूनच गेलो.

'मोहन धारिया पुढं म्हणाले की, सचिवांना देखील सर्व काही कल्पना देण्यात आली आहे. गुजराथचे तंबाखू–उत्पादक शेतकरीदेखील बोलविण्यात आले आहेत. तुम्ही फक्त उद्या मीटिंगमध्ये हजर रहा, तिथं सर्व निर्णय ताबडतोब घेण्यात येतील.

'आम्ही मीटिंगमध्ये गेलो ते मनामध्ये मोहन धारियांना धन्यवाद देत आणि काहीसे हवेत तरंगत. तिथं बोलायला संधी मिळताच आम्ही आमची बाजू जोरदारपणे मांडली. सर्वांनी आमचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं. मनुभाई शहा वगैरे खासदार हजर होते. तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांशी वाटाघाटी करण्याच्या मीटिंगमध्ये धारियांनी काही विडी कारखानदारांनादेखील बोलावलं होतं. किसनभाई सारडा, देवकीनंदन सारडा ही मंडळी चर्चेला उपस्थित होती.

'मीटिंगमध्ये मोहन धारिया म्हणाले की, शेतकऱ्यांचा हा तंबाखू ताबडतोब खरेदी केला जावा अशी सरकारची अपेक्षा आहे. विडी कारखानदाराकडे हा तंबाखू खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर सरकार कारखानदारांना भांडवलपुरवठा करण्यास तयार आहे! विडी कारखानदार म्हणाले, ठीक आहे! सरकारनं भांडवल पुरवलं तर आम्ही तंबाखू खरेदी करू! ह्या वाटाघाटीच्या वेळी मोहन धारियांनी पुण्याच्या बी. डी. किल्लेदारांना निमंत्रित केलं होतं. बीडीचं सगळं आयुष्य पुण्यात गेलं तरी त्याचं मूळगाव निपाणी म्हणून धारियांनी त्यांना मुद्दाम बोलवून घेतलं असावं. एरवी बीडीचा या विषयाशी तसा संबंध काहीच नाही.

**रस्ता-रोकोचा खेळ दोन-तीन तासातच खलास झाला तरी त्याचा बराचसा परिणाम झाला**

वाटाघाटी चालू असताना धारिया मध्येच एकदम म्हणाले, 'हे प्रश्न असे चर्चेतून सुटणार नाहीत. त्यासाठी आपण एक कमिटी नेमू आणि त्या कमिटीमार्फत प्रत्येक भागातील प्रश्नावर स्वतंत्र विचारविनिमय करून ते प्रश्न सोडवू !

'आम्ही आशेनं निपाणीला परतलो. शेतकऱ्यांना सांगितलं की, आपल्याच भागातील मंत्रीमहोदय मोहन धारिया ह्या प्रश्नात जातीनं लक्ष घालणार आहेत. लवकरच आता एक कमिटी स्थापन होईल. संपूर्ण मंत्रिमंडळासमोर, खुद्द पंतप्रधान मोरारजीभाई देसाईंसमोर आपला प्रश्न धसास लावण्याचं आश्वासन मोहनभाईंनी दिलं आहे. कमिटीवर आपल्याच गावचे बी. डी. किल्लेदार आहेत. तेव्हा आपला प्रश्न निश्चितपणे सुटणार !

'आमचे शेतकरी आशाळभूतपणं कमिटीच्या निर्णयाची वाट पहात बसले. बी. डी. किल्लेदाराना आम्ही निपाणीला बोलवलं. त्याना तंबाखू उत्पादनखर्चाची सर्व आकडेवारी दिली. सर्वत्र फिरवून समस्या समजावून सांगितली. किल्लेदार म्हणाले, 'आता दिल्लीला जाऊन मी तुमचा प्रश्न जोरदारपणे मांडतो. तुम्ही निश्चिंत असा !'

'बी. डी. किल्लेदार दिल्लीला गेले आणि आम्ही निपाणीत वाट बघत राहिलो. तोपर्यंत मनुभाई शहा, सारडा वगैरे मंडळींनी दिल्लीमध्ये आपली लॉबी व्यवस्थित तयार केली आणि एक दिवस मोहनभाई धारियांनी तंबाखूच्या सरसकट खरेदीचा भाव एक रुपया किलो असा जाहीर केला.

'गुजराथच्या तंबाखू-शेतकऱ्याला तेव्हा एक रुपया किलो हा दर देखील किफायतशीर होता. कारण तिथं इकडच्यासारखे सुटीचे रिवाज नाहीत. एव्हढंच नव्हे तर तंबाखू विकताना ते मधल्या जाडजूड खोडासकट वजन करून देतात. निपाणीत खोड काढून नुसती पानं वजन करून घेतली जातात आणि त्यातदेखील पानाच्यामधल्या शिरेसाठी मणामागे दोन किलो काडीसूट शेतकऱ्याला द्यावी लागते. गुजराथचा तंबाखू तेव्हा सहा आणे किलोनं चालला होता. त्याना एक रुपयाचा दर म्हणजे फायदाच फायदा ! आम्ही आंदोलन केलं तेव्हा बाजारपेठेत पाच रुपये किलो दर होता; पण सरकारनं जाहीर केला एक रुपया किलो !

'मोहन धारियांनी तंबाखूचा सरकारमान्य दर एका किलोला एक रुपया जाहीर केला त्याबरोबर निपाणीतील व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची कोंडी करायला सुरुवात केली. व्यापारी म्हणाले, 'तुम्ही दर मागायला सरकारकडं गेलात ना, मग सरकारलाच तंबाखू खरेदी करायला सांगा ! आम्ही तुमचा तंबाखू घेणार नाही ! मरा !!

'मोहन धारियांच्या ह्या कृतीमुळं निपाणी-परिसरातील शेतकऱ्यावर उपासमारीनं मरण्याची वेळ आली. व्यापारी म्हणाले, आम्ही तंबाखू खरेदी करावा अशी इच्छा असेल तर आंदोलन मागे घ्या; सरकारचा नाद सोडा आणि आम्ही सांगू त्या दरानं आणि पद्धतीनं तंबाखू द्या !

'तिथं बिडी कारखानदार मंडळींनी तंबाखू खरेदीसाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाच्या योजना तयार करून मंजूर करून घेतल्या. भांडवल पदरात पाडून घेतलं; पण खरेदीसाठी आलेच नाहीत ! त्यांनी इथल्या व्यापाऱ्यांना कळवलं, तंबाखू खरेदी करून कारखान्यात पाठवून द्या !

'शेतकरी आंदोलनात शेतमालाच्या भावासंबंधी वाटाघाटी करण्याचा प्रसंग आला तर व्यापारी आणि दलाल ह्यांच्या खिशात असलेलं सरकार उत्पादक शेतकऱ्याला कसं फसवतं ह्याचा पुरेपूर अनुभव निपाणीच्या शेतकऱ्याला आला. आम्ही मोहन धारियांना एक पत्र पाठवलं. 'आपल्या मध्यस्थीचा आम्हाला जो अनुभव आला तो लक्षात घेऊन आम्ही आपल्याला विनंती करतो की, आपण जरी निपाणीचे असलात आणि मध्यवर्ती सरकारच्या मंत्रिमंडळात असलात तरी कृपया येथील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नात इथून पुढं कृपया आपण लक्ष घालू नये. आम्हीदेखील ह्यापुढं आपणास तसदी देणार नाही !'

सुभाष जोशींनी निपाणीतील तंबाखू उत्पादक शेतकऱ्याच्या पहिल्या आंदोलनाची जी कहाणी सांगितली ती विचार करण्यासारखी आहे. भविष्यात शेतकरी संघटनेला दूध-भात, भुईमूग, कापूस वगैरे शेतमालाच्या भावासंबंधी मध्यवर्ती सरकारशी वाटाघाटी करण्याचे अनेक प्रसंग येणार. त्या वेळी शासनातर्फे असेच मध्यस्थ तयार ठेवण्यात येणार ! पुढच्यास ठेच मागचा शहाणा किंवा history repeats itself वगैरे म्हणी बाळबोध जरी वाटल्या तरी ज्या आंदोलनामुळं इतिहासाचीच 'चौकट' बदलणार अशी लक्षणं दिसत असताना तो इतिहास घडविणाऱ्यांनी वेळीच 'सावधान' असल्यास बिघडले कोठे ?

( क्रमशः )

(लेखकाचा पत्ता : वसंत बहार ११९-ब, प्रभात तरोड पुणे ४११००४)

व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

श्यामचा संसार ( कथा १२ वी )

फिरोझ रानडे

# सर्व प्रश्नांवर एकच तोडगा !

एखादा रविवार असा उजाडतो की, त्याला रविवार म्हणजे सुट्टीचा वार-सुखाचा वार म्हणण्याऐवजी रविवार म्हणजे ताक घुसळायची रवी व त्याचा वार म्हणणेच जास्त बरोबर व योग्य ठरावे.

परवाच्या रविवारी श्याम असाच घुसळून निघाला ! रविवारबद्दल श्यामच्या काय कोमल भावना आहेत हे जे वाचक श्यामच्या कथा सपूर्णपणे वाचत असतील त्याना माहीत आहेतच. लहान मूल पुस्तकात जसे एखादे मोराचे पीस अलगद जपून ठेवते, त्याचप्रमाणे श्याम रविवारचे पीस ह्या आठवड्याच्या सात पानी पुस्तकात जपून ठेवतो; पण एखादा दिवस असा काही उगवतो की विचारू नका !

त्या रविवारी सकाळी-सकाळी राधाचे नगरचे कोणी मामा त्याचेकडे आले. श्यामचा भूगोल सर्व लोकांचा असतो तसाच कच्चा आहे हे एकदम कबूल; पण काही जिल्हे व गावे अशी बिनचेहऱ्याची असतात की, अगदी भूगोल विषय पक्का असणाऱ्यांना देखील ही गावे वा जिल्हे कुठे आहेत, काय आहेत हे सांगता येणं शक्य होत नाही. हा त्यांचा दोष नाही. त्या गावांचाच आहे.

आता असे पहा. आग्रा म्हटलं, अलाहाबाद म्हटलं की ही गावे कोठे असतील, काय असतील ह्यांची सर्वसाधारण सर्वांना कल्पना असते; पण तेच जबलपूर ह्या गावाबद्दल विचारा. जबलपूरला खूप वर्फ पडतो असे कोणी म्हटले तरी विश्वास बसतो, तसा जबलपूरला चेरापुंजीच्या खालोखाल पाऊस पडतो म्हटलं तरीही आपला विश्वास बसतो. कारण मुळात जबलपूर कोठे असावे ह्याबद्दलच आपल्याला संभ्रम असतो.

तसे थोडेसे नगर जिल्ह्याबद्दल व नगर ह्या गावाबद्दल होते. पुणे गाव वा जिल्हा कुठे आहे हे कोणाही मराठी माणसाला सागावे लागत नाही. किंबहुना कोणी मराठी ठरावयाचा असल्यास त्याला प्रथम पुणे कोठे व काय आहे हे माहीत असणे आवश्यक असते. तेव्हा पुण्याबद्दल बोलणे सोडाच, पण सर्वसामान्य माणसालाही नाशिक, विजापूर रत्नागिरी ( जुना ) ह्या जिल्ह्याबद्दल व गावांबद्दल माहिती असते; पण नगरबद्दल ?

तर त्या अशा बिनचेहऱ्याच्या गावाहून राधाचे मामा रविवारी सकाळी-सकाळी आले. मामा हे नगरच्या एका शाळेचे मुख्य-अध्यापक होते. ते व त्यांच्यासारखे काही मुख्याध्यापक मुख्यमंत्र्यांना भेटण्याकरता आले होते. पण त्यापूर्वी लाडक्या भाचीला भेटण्याकरता म्हणून ते घरी आले. कारण मुख्यमंत्र्यांना भेटून ते परस्पर नगरला जाणार होते.

मामा आले तेव्हा मराठी माणसाच्या पाहुणचाराची पराकाष्ठा म्हणजे गरम चहा. राधाने त्याना व त्यांच्याच बरोबरीने श्यामला पण दिला. चहा घेता घेता मामा श्यामला म्हणाले, 'तुम्ही काहीही म्हणा श्यामराव, जोपर्यंत संस्कृत भाषा शाळा-कॉलेजमधून कंपल्सरी करत नाहीत तोपर्यंत भारताला तरणोपाय नाही. '

' पण मी कधी काय म्हटलं होतं मामा ' श्याम कळवळून मनाशी म्हणाला व चहा बशीत ओतून पिऊ लागला.

श्याम काहीच बोलत नाही हे पाहून मामाना चेव चढला. ते पुढे म्हणाले, ' हेच तुमच्या लोकाचे चुकते बघा. एखादी गोष्ट पटत नसली तर तसे स्पष्ट सागावे म्हणजे दुसरा माणूस समजावून सांगतो. अहो, संस्कृतात काय नाही ? तुमची विमानं आहेत, रॉकेटस आहेत, ॲटम बॉम्ब आहे. आपल्या पूर्वजांना ह्या सगळ्याची चांगली माहिती होती.'

' मग मुसलमानांवर वा ब्रिटिशांवर का नाही आपल्या पूर्वजांनी एखादा ॲटम बॉम्ब टाकला ?' श्यामने प्रश्न केला. अर्थातच मनाशी.

श्याम परत काही बोलला नाही म्हणून मामांना परत चेव आला. ते म्हणाले, ' तुम्ही काय बोलणार म्हणा, माझी आर्ग्युमेंटस्च अशी असतात की कोणाला काही बोलायची सोयच नसते. आज आम्ही साहेबांना हेच सांगणार आहोत. गरिबी हटवायची आहे ना ? झोपडपट्टीचा प्रश्न सोडवावयाचा आहे ना ? अगदी तुम्हाला सर्वधर्मसमभाव आणावयाचा आहे ना ? मग प्रथम सर्व शाळांत-कॉलेजात संस्कृत कंपल्सरी करा ! भारताच्या सर्व प्रश्नावर एकच तोडगा आहे तो म्हणजे संस्कृत कंपल्सरी करणे !' एवढे म्हणून ते सुसंस्कृत मामा उठले.

' खरं आहे तुमचं म्हणणं !' हे वाक्य मात्र श्याम मोठ्यानं व आनंदानं म्हणाला. जोरात म्हणावयाचं कारण मामा जाणार म्हणून व आनंदात ह्याकरता की साहेबांनी संस्कृत काय लॅटिनसुद्धा कंपल्सरी केलं असतं तरी श्यामला काही आता ते शिकावं लागलं नसतं.

मामा गेले तशी राधा स्वयंपाकघरात गेली. तेव्हा आता काय करावं ह्या विचारानं श्याम बाहेरच्या बाल्कनीत आला.

शेजारच्या बाल्कनीत शेजारचे बर्वे उभे होते. श्यामला पाहताच ते म्हणाले, ' काय शामराव, आजचा पेपर वाचलात की नाही ?'

आता हा काय प्रश्न झाला ? आजचा पेपर सगळेच वाचतात; पण बर्वे किंवा तत्सम लोक ज्या वेळी असा प्रश्न विचारतात त्या वेळी त्यांच्या मनात दुसऱ्यानं आपल्याला महत्त्वाची वाटलेली बातमी वाचली आहे की नाही हेच मुख्यतः विचारावयाचं असतं; पण ते लोक तसं सरळ कधीच विचारत नाहीत. श्यामला पण अशा प्रश्नाची सवय झाली होती. कारण तोही वेळोवेळी लोकाना असे प्रश्न विचारत असे. तेव्हा तो म्हणाला,

' वाचला की, काही विशेष ?'

'वाटलंच होतं मला, तुम्ही त्या महत्त्वाच्या बातमीकडे दुर्लक्ष कराल म्हणून. अहो, आपण गुजराथी लोकाना ×× समजतो; पण बघितलंत ! रिझर्वेशनविरुद्ध काय आवाज

उठवला आहे ह्या पठ्ठयांनी !'

बर्वे तसे एकारांत 'स्थ' असले तरी सर्व बाबतीत त्यांची मते मोठी सुधारलेली अशी होती. विचारी व समभाव ठेवणारे म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. त्याच्यासारख्या गृहस्थांनी निरपराध हरिजनांवर जुलूम-जबरदस्ती वगैरे करणाऱ्या गुजराथी लोकाना पट्ठे म्हणून शाबासकी द्यावी ह्याचं श्यामला आश्चर्य वाटलं.

त्या आश्चर्यानं श्याम काही वेळ बोललाच नाही. त्यामुळं बर्व्यांना फारच चेव आला व ते त्या चेवात म्हणाले, 'तुमच्यासारखे लोक चूप रहातात म्हणून ह्या लोकांचं फावतं. अहो, मेडिकलला व इंजिनिअरिंगला असे खालच्या दर्जाचे लोक घेतले तर भारताचं नुकसान नाही का होणार ?'

श्याम म्हणाला, अर्थातच मनाशी—

'बर्वे गुरुजी, आतापर्यंत मेडिकलला व इंजिनियरिंगला फक्त तुमच्यासारखे उच्च दर्जाचेच लोक जात असत. मग त्या त्या क्षेत्रात असा 'क्लोरोफार्म' का द्यावा लागतो ?'

श्यामच्या परत चूप रहाण्यानं बर्व्यांना परत चेव आला. ते म्हणाले, 'मी सांगतो श्यामराव, भारताच्या सर्व प्रश्नांवर एकच तोडगा आहे. तो म्हणजे कोणत्याही जातीकरता, मग त्यांना दलित म्हणा, काही म्हणा जागा रिझर्व न ठेवता फक्त गुणवत्तेवर जागा द्याव्यात !'

आता श्यामला काही तरी बोलणं भाग होतं. नाही तर श्यामच 'रिझर्व' जातीच आहे असा बर्व्यांचा समज झाला असता. बरं काही बोलावं तर बर्वे रागानं असे काही लाल-लाल झाले होते की ते केव्हा फुटतील ह्याचा काही नेम नव्हता.

सुदैवानं सौ. बर्वे साधारण बर्वे वगैरे आडनावाच्या बायका ज्या कर्कशतेनं हाक मारतात त्या कर्कशतेनं बर्व्यांना हाक मारत्या झाल्या. त्यामुळे जगात आपण दुसरे काही असलो तरी घरात दलित आहोत ह्याची जाणीव बर्व्यांना मोठ्या तत्परतेने झाली. त्यामुळं गुजराथचा प्रश्न त्यांनी तसाच लोंबकळत ठेवला व तातडीनं ते घरात गेले.

आता काय करावं असा प्रश्न श्यामला पडला. राधा स्वैपाक करत असल्यामुळं घरात असून नसल्यासारखी होती. कारण स्वैपाक करताना श्यामनं केलेली लुडबूड तिला अगदी आवडत नसे.

श्यामच्या एका बाजूला बर्वे रहात तर तर दुसऱ्या बाजूला कर्वे ! ह्या कर्व्यांकडेही भारताच्या सर्व प्रश्नावर एकच तोडगा होता.

कर्वे ह्यांच्याकडचा सर्व प्रश्नावरचा एकच तोडगा म्हणजे वृत्तपत्रस्वातंत्र्य हा होय. कोणीही, कुठेही, केव्हाही कर्वे ह्यांना भेटो; ते प्रत्येकाला कळकळीने सांगत, 'बाबांनो, व्यक्तिस्वातंत्र्य जोपासावयाचं असेल, लोकशाही टिकवावयाची असेल, नवीन स्वतंत्र विचारांची पिढी तयार करावयाची असेल... वगैरे...वगैरे तर त्यावर एकच तोडगा म्हणजे वृत्तपत्रांना संपूर्ण स्वातंत्र्य द्यावं !'

आता कर्व्यांचे हे विचार वाचून त्याचा स्वतःच्या मालकीचा मोठा छापखाना असेल व ते आपलं स्वतःचं एखादं वर्तमानपत्र टिळक-आगरकर संप्रदायाला धरून काढत असावेत व त्याच संप्रदायाप्रमाणे 'सत्य दिसेल ते बोलणार व इष्ट असेल ते करणार' वगैरेचं योग्य व्रत त्यांनी घेतलं असावं व वृत्तपत्रावरील बंधनामुळं त्यांची कुचंबणा होत असावी, असा कोणाचाही समज होणे स्वाभाविकच होतं.

पण कसलं काय नि कसलं काय, मराठी संप्रदायाप्रमाणं त्यांच्या वृत्तपत्राचा मालक कोणी गुजराथी वा मारवाडी होता. त्या गुजराथ्याच्या वा मारवाड्याच्या कापडाच्या गिरण्या, साबणाचे कारखाने, टूथपेस्ट- लिप्स्टिकस् वगैरे बनवण्याचे कारखाने असा फार मोठा उद्योग-समूह होता. बाकी मोठ्या उद्योगसमूहांच्या मालकांची वर्तमानपत्रं होती म्हणून त्यानेही आपले एक वर्तमानपत्र काढलं होतं. त्या वर्तमानपत्राचं नावसुद्धा त्या मालकाला चटकन आठवलं नसतं.

अशा त्या वर्तमानपत्रात कर्वे उपसंपादक म्हणून सिनेमा-नाटकं व इतर सटर-फटर गोष्टींवर सिनेमांच्या जाहिरातीच्या येणाऱ्या पैशाकडे लक्ष ठेवून, टीका वगैरे लिहीत असत. पण इतर वेळी मात्र पगडी वा मिशा न ठेवता, टिळक-आगरकरांच्या त्वेषात म्हणत, 'ह्या सर्व प्रश्नावर तोडगा एकच तो म्हणजे वृत्तपत्रस्वातंत्र्य !' आहे की नाही कर्वे यांची कमाल ?

कर्वे यांची कमाल असो वा नसो, ह्या त्यांच्या 'तोडग्या'च्या भयामुळं त्यांच्या वागणुकीकडे साधी नजर टाकणंही श्यामला अवघड वाटू लागावं ह्यात नवल नाही.

आता फक्त समोर बघत किती वेळ रहाणार असा श्याम विचार करत होता, तेवढ्यात दारावरची बेल वाजली. तशी घरात मुलं होती, नाही असं नाही; पण बेल वाजली असता दार उघडावयाचं काम आपलं नसतं, अशा भावनेत साधारण मुलं असतात, तशी श्यामच्या घरातली मुलं होती. राधा स्वैपाकात गुंतलेली, त्यामुळं श्यामला दार उघडणं भाग होतं. त्याप्रमाणं त्यानं दार उघडलं.

बघतो तो काय ? दारात हसतमुख माया उभी ! श्याम, अर्थात स्वगत, म्हणाला, 'बोंबला, आता जो काय रविवार थोडाफार सुखानं जायचा होता त्याचीही वाट लागली !'

माया ही राधाची मैत्रिण. महाराष्ट्रात जसं प्रत्येकजण कशाला तरी वाहून घेत असतो त्या नियमानुसार मायानं स्वतःला स्त्री-मुक्ती कार्याला वाहून घेतलं होतं. त्यामुळं लग्न, नवरा, संसार, मुलं वगैरे काहीही बंधन तिच्यावर नव्हतं. त्यामुळं रविवार हा सुट्टीचा वार असतो, लोकाना दुपारचं लवंडावयाचं असतं ह्या भावना मायाला नव्हत्या. त्यामुळं माया अशी वेळी-अवेळी येऊन टपकत असे व एकदा आली की अगदी जेवण-खाण वगैरे करूनच जात असे !

श्यामला राधाचा कितीही राग येत असला तरी तिच्याविरुद्ध 'ब्र' काढावयाची त्याची छाती नव्हती. कारण माया ही राधाच्या आवडत्या मैत्रिणींपैकी होती. हो, बायकाना पूर्वीच्या राजेलोकाना जशा आवडत्या व नावडत्या राण्या असत त्याप्रमाणे आवडत्या व नावडत्या मैत्रिणी असतात.

तेव्हा एक वेळ राधाच्या नावडत्या मैत्रिणीबद्दल काही बोललं तर राधाला चाललं असतं, नव्हे, आवडलं असतं; पण आवडत्या मैत्रिणीबद्दल ती काहीएक उणं ऐकून घ्यायला तयार नसे व मायाबद्दल तर बिलकूल नाही.

श्यामला हे राधाचं माया-प्रेम माहीत होतं म्हणून तो मायाला पहाताच खोटा-खोटा आनंद दाखवून तेथूनच ओरडला, 'राधा, कोण आलं आहे ते पाहिलंस का ? तुझं

आवडते माणूस !'

'अय्या, माया !' राधा घाईघाईनं धुतलेले हात पातळाला पुसत पुसत म्हणाली.

मग मायाबरोबर जेवणं झाली. दुपारची झोप श्यामला सोफासेटवर काढावी लागली. कारण राधा व माया बेडरूममध्ये पडल्या-पडल्या गप्पा मारत होत्या.

चार-साडेचार झाले. चहाचे वेळी सगळे जेवणाच्या टेबलाभोवती जमले व काही तरी बोलता-बोलता मायाला ठिणगी लागली व तिने हा हा म्हणता पेट घेतला.

मायाने श्यामला पुरुषजातीचा एकमेव प्रतिनिधी मानून चांगलं फैलावर घेतलं. बाल-विवाह, स्त्री-शिक्षण, स्त्रियांना नोकरी, बलात्कार, सतीची चाल-काही म्हणून काही मायानं सोडलं नाही. शेवटी ती हिंदुस्थानच्या मागासपणाकडे व दरिद्रीपणाकडे वळली आणि वळता वळता म्हणाली, 'ह्या सर्व प्रश्नावर एकच तोडगा, तो म्हणजे स्त्री-स्वातंत्र्य !' श्यामनं ते शांतपणे ऐकून घेतलं.

योग्यवेळी माया गेली. राधा व श्याम झोपायच्या तयारीत होते. तेवढ्यात लाइट गेले. राधाची चिडचिड झाली. ती म्हणाली, 'एवढे रॉकेट सोडतात, पंचवार्षिक योजना आखतात, पण साधा वीजपुरवठा काही करता येत नाही ह्या लोकांना ! जीव कसा नकोसा करतात.'

'ह्यावर एकच तोडगा आहे.' आता-पर्यंत सगळ्यांचे तोडगे ऐकून श्यामही तोडगेबाज झाला होता.

'तो कोणता बाई ?' राधानं अभावितपणे विचारलं व श्यामनं लाइट नसलेल्या दिव्याचं बटण बंद करून राधाला तोडगा सांगितला तो कोणता ते जुन्या व जाणत्या वाचकांना वेगळा सांगायला का पाहिजे? □

---

# पुस्तके

## उपरा

या आत्मवृत्तात ज्याप्रमाणे वेदनेचा वा विद्रोहाचा ताशा वाजविलेला नाही, त्याचप्रमाणे दुःख मूकपणे सूचितही केलेले नाही. कोणताही अलंकार न ल्यालेल्या भाषेत जमेल तेवढे सरळ सांगितले आहे.

**—अजय आरोसकर**

उपरा हे एका कैकाडी जमातीतील माणसाचे आत्मवृत्त आहे. सरकारी नियमानुसार कैकाडी हे भटक्या जमातीपैकी एक. म्हणजे सरळसरळ अस्पृश्य नव्हेत; पण त्यापैकीच. भटकी जमात म्हणजे संस्कृतीचा-नागरी संस्कृतीचा—वारसा नाही हे निश्चित. त्यांची एक स्वतंत्र भाषा. त्यांचे असे खास काही रीतीरिवाज, धार्मिक विधीसंस्कार; पण पोटा पाण्याच्या धडपडीतच सारी शक्ती संपत असल्यामुळे आणखी काही कलाकुसर करायला वेळच नसलेली जमात. त्यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीत काही लोभसवाणे नाट्य असणे संभवतच नाही. त्यांचे धार्मिक विधी तसे आतुरीच. म्हणजे बोकड मारून नैवद्य घेणारी देवता आणि त्या देवतेची तशी स्पष्ट कल्पनाही नाही. चार—पाच दगड ओळीने मांडून त्यावर हळद-कुंकू वाहून उदबत्ती लावली की बरेचसे काम झाले. प्रसंगाप्रमाणे कोंबडी वा बोकड सरळ जिवंतपणे कापणे-क्वचित भयाण अमावास्येच्या रात्री दूर गावाबाहेर.

सर्व भांडणे सरपंचासमोर जत्रेच्या सुमारास वर्षातून एखादवेळी मिटविणे. ते सांगतील ते प्रमाण, मग मागे काही कुरबूर उरायची नाही.

एक वन्य जीवन, पशुपेक्षाही कमी दर्जाचे. पशुंचा क्वचित का होईना—विणीच्या वेळी आढळणारा देखणा नाच नाही, मंजुळ ध्वनी नाहीत, निर्भर असे काहीही नाही.

सतत एकच ध्यास जगणे ! आणि जगणे म्हणजे दोनच क्रिया—एक पोट भरणे आणि पोट भरण्यास गरज भासणारी वीण वाढविणे. कोठेही हास्य नाही. कोठेही मोकळ्या मनानं केलेला आविष्कार नाही. त्याची शक्यताही नाही— हे सारं भयंकर आहे; पण ते भयंकर कोणाला ? त्यांना नाही. ते एक चिरंतन जीवन जगत आहेत. त्यातून एखादा जरा बाजूला गेला तरी तो त्यांना चालत नाही.

तसा 'एक' जरा—फार नाही—जरा बाजूला गेला. त्याचं हे आत्मवृत्त आहे.

: २ :

दुःखे आहेत ती केवळ शारीरिक पातळीवरची. कष्ट आहेत, वेदना आहेत, मारझोड आहे. पण त्यांची सामान्य शारीरिक पातळी कोठेही, थोडीही सुटत नाही. मित्राच्या आग्रहानं लग्नाच्या मंडपात जेवायला बसला असताना पानावरून उठावं लागत आहे, हाकललं जात आहे, '**खाली वाकला माझा कान धरला आन् म्हनला, 'व्हंकाड्या, काय समाजतं का न्हाय ? चल निघ हितनं !'** तहानेनं जीव कासावीस झाला असता ओंजळीतून पाणी पिताना चुकून पाण्याच्या पिंपाला स्पर्श झाल्याबरोबर बिन्हाडातील माणसं 'आरं, आरं... मुड्या ! बाटीवलंस का पानी आता !' म्हणत चवताळून सगळं टिपाड वतून दिलं. गाडी जुपली आन पानी

आनायला पिटाळली. शाळेत शिकत असतानाच अगदी कोवळघा वयातच त्याला 'तू भाइर गेल्यावर तिनं लुगडं फेडलं. मला बग म्हणाली. मी बगितलं आन् झालं. बारा झाण्यात एवढीच मजा! रुपया असता, तर फुडचं.' असं सागणारे सवंगडी आहेत.

भूक, तहान, कामवासना या तीन गोष्टी-वर अगदी सामान्य जीवन जगणारी माणसं यात आहेत. आहेत. नवऱ्यानं संशय घ्यावा. स्त्रीला वेड लागून तिचा अंत व्हावा. स्त्रीला स्वच्छ आंघोळ करणं, केस विंचरणंदेखील करता येऊ नये, म्हणजे तिनं ते करू नये अशीच सर्वांची अपेक्षा. 'आपन घानीतलीच मानसं. घानीतच समजून राहावं.', असं म्हणणारी. आणि एखादी वेगळी निघाली तर तिला तसं वेडं होऊन दिशाहीन व्हावं लागावं.

तसं पाहिलं तर 'उपरा' मधील जीवन जी. एं.च्या 'तुती', 'कैरी', 'राघी' किंवा शंकर पाटील याच्या 'ऊन', 'भुजंग' या कथातील जीवनाचं जवळचं नातं असणारं आहे. 'उपरा' हे एका नगण्य उपेक्षिताचं अंतरंग आहे. एका सहनशील सामान्य माणसाचं-सामान्य म्हणजे तुम्हाआम्हा सर्व जातीमधील उपेक्षितांचं–केवळ एका कैकाड्याचं आत्मवृत्त नाही. ज्याना जगण्यासाठी केवळ अपार कष्ट करावे लागतात व एका ठिकाणी 'घर' म्हणून काहीही नाही, कोणत्या तरी अर्थशून्य चालीरितीचा जीवघेणा काच मात्र सतत लागलेला आहे असे एक नीरस जीवन. प्रतिभेचा स्पर्श झालेल्या एखाद्या जी. एं. नी यातून एक झपाटलेली मानवी मूल्यं जाळणारी, निर्माण करणारी, प्रश्नांकित करणारी कलाकृती निर्माण केली असती; शोकातिका ती हीच आहे की, लक्ष्मण माने याचं जीवन इतकं भयंकर आहे की त्यात जी. ए. च नष्ट होतो. उरतो तो एक अतिसामान्य केवळ जगण्याची धडपड करणारा आधार शोधीत भटकणारा एक माणूस. या माणसाला शशी भेटते; डॉ. दाभोळकर भेटतात, त्याच्यासारख्या इतराना असे कोणी भेटत नाहीत असे असख्य 'लक्षा' निर्ढावलेले निर्जीव जीवन जगत असतील!

मी जी. एं. चं, शंकर पाटील याचं नाव जाणीवपूर्वक घेतले आहे. आणखी एका असामान्य व्यक्तीचं घेणार आहे; ते म्हणजे लक्ष्मीबाई टिळक आणि त्यांची 'स्मृतिचित्रे!' लक्ष्मीबाई काही जीए वा शंकर पाटील यांच्यासारख्या प्रतिभावंत साहित्यिक नव्हत्या. त्याची 'स्मृतिचित्रे' ही एकमेव कलाकृती. आणि ती आज अनेक वर्षे आपल्याला स्पर्श करीत नितळपणे टिकून राहिलेली आहे. का?

: ३ :

'उपरा' मध्ये तीन भाषा आहेत. एक कैकाडी भाषा. त्याचे 'अनुवाद' कंसामध्ये लेखकाने दिले आहेत. दुसरी 'आनीपानी'ची अशुद्ध, 'ग्रामीण' म्हणून सर्वमान्य झालेली आणि तिसरी व्याकरणशुद्ध नागरी भाषा. केवळ वैचित्र्य म्हणून कैकाडी बोली गोड वाटते का? खरे म्हणजे सर्व संवाद त्या भाषेतील हवे होते. पण ती कोणाला समजणार नाही म्हणून लेखकाने 'ग्रामीण' बोलीचा वापर केला आहे का? आनी पानीची भाषा वापरली नसती तर?

१८०२ मध्ये वर्डस्वर्थने आपल्या काव्यसंग्रहाला एक विस्तृत अशी प्रस्तावना लिहिली आहे आणि त्यात ग्रामीण बोलीचा पुरस्कार केला आहे. त्याला तर ग्रामीण जीवनाचेही जबरदस्त आकर्षण होते. शहरातले जीवन खोटे. लोक बेगडी. निसर्गाच्या सान्निध्यात सतत राहाणारे खेडुत, त्याचे जीवन आणि त्याची भाषा खरीखुरी अस्सल! म्हणून तीच भाषा काव्याला अधिक योग्य, असे त्याने इतक्या प्रकारे सांगितले की त्याच्या मित्राला, कोलरिजला ते खोडून काढावे लागले. प्राथमिक जीवन जगणाऱ्या खेडुताच्या जीवनाचे आकर्षण हे सरोवराच्या काठावर एका सुरेख बंगल्यात राहून – जगण्यासाठी फारशी दगदग करायची नाही, अशाना असणे हे ठीक आहे; पण वस्तुतः ते जीवन तसे 'काव्यमय' नसते आणि त्याची भाषा माणसाच्या काही प्राथमिक गरजा भागवण्यापलीकडे फारसे काही करू शकणार नाही. त्या भाषेची ताकद फार अपुरी आहे आणि मुख्य म्हणजे ग्रामीण जीवन हे शहरी जीवनाची भ्रष्ट नक्कलच असते. स्वतः वर्डस्वर्थची कविता ही ग्रामीण भाषेत लिहिलेली नाही. कोलरिजचे हे म्हणणे पुढे अनेक समर्थ कलावंतानी खोटे ठरविले. १९ व्या शतकाच्या अखेरीस हार्डीने कादंबरी व काव्य लिहिताना ग्रामीण भाषेचा फार कल्पक उपयोग केला. त्यानंतर विसाव्या शतकाच्या सुरुवातीस डी. एच्. लॉरेन्सने तर काही कविता पूर्णपणे ग्रामीण भाषेतच लिहिल्या व त्या गाजल्या. सिन्ज (Synge) या आयर्लंडमधील नाटककाराने त्याची नाटके खास ग्रामीण बोलीत लिहिली व तीही अशीच खूप लोकप्रिय झाली.

काव्याच्या वा साहित्याच्या भाषेविषयी आणखी एक नवा विचार टी. एस्. एलियटने माडला तो म्हणजे–To purify the dilect of the tribe. म्हणजे छापील, नि.सत्त्व नागरी भाषाही नव्हे. वा कचकचीत ग्रामीण बोलीही नव्हे. कलेच्या निवडीचे संस्कार झालेली बोली भाषा. मग ती ग्रामीण असेल वा नागरी असेल; पण प्रामुख्याने बोली भाषाच असेल!

'उपरा'मधील ही आनीपानीची ग्रामीण भाषा ही अशी जाणीवपूर्वक स्वीकारलेली भाषा आहे. ती कैकाड्याची भाषा नाही. लक्ष्मण माने या 'लेखका'ने स्वीकारलेली एक बोली आहे. मग त्यातील अनेक वेळा येणारे 'ग्राम्य' शब्द टाळले असते तर? त्या शब्दांमुळे असे काय साधले आहे की ते नसते तर बरे झाले नसते. स्वतः लक्ष्मण माने याना 'साताऱ्याच्या झोपडपट्टी'त शशीबरोबर राहात असताना हे शब्द नकोसे झालेत. माझा या शब्दांच्या ग्राम्यतेविषयी विरोध नाही. भीती ही की आता ही भाषा सर्वमान्य मराठी बोली होते का काय? तसे लक्ष्मण माने याच्या या एका पुस्तकाने ते होईल असे नव्हे; पण हलकेहलके सभ्य भाषा ही खरोखरीच अनैसर्गिक होऊ पहात आहे. कृत्रिम वाटू लागत आहे आणि सतत अचकटविचकट शिव्या आता सदाशिवपेठी लोकही सहजपणे देऊ लागले आहेत. ती मडळी आजची फॅशन म्हणून बोलत असतील. ती बोलोत. लक्ष्मण माने याना ती आवडत नसताना केवळ परिणाम साधण्यासाठी त्यानी ती बोलू नये; हे माझे मागणे, एवढच एक मागणे.

कोणती भाषा, कोणते शब्द कोठे समर्थनीय असतील याला कसलाही नियम नाही. मर्ढेकरावर माग 'अश्लीलते'चा जाहीर खटला झाला होता. त्या मडळीनाही हा प्रश्न समजला नाही. मलाही तो या आत्मवृत्तातील अशा शब्दाना आक्षेप घेताना समजला

नसणे शक्य आहे; पण माझ्यापुढे डिकन्सची 'ऑलिव्हर ट्विस्ट' ही कादंबरी आहे. एकही शिवराळ शब्द न वापरता गुन्हेगारी जग, वेश्यांचे जग डिकन्सने त्या जीवनातील सर्व भयानकतेसह उभं केलं आहे. अर्थात त्याच्यावर दोन्ही बाजूंचे टीकाकार अजून आग पाखडत आहेत. कादंबरी प्रथमपासून आजपर्यंत वाचकाची आवडती आहे. एक टीकाकार म्हणतात, वेश्या आणि गुन्हेगार इतकी शिवराळशून्य भाषा बोलताना कोणी कोठे पाहिले आहे काय? दुसरे म्हणतात की, वेश्या आणि गुन्हेगार काय बोलतात, काय करतात यात आम्हाला रसच नाही.

म्हणजे वास्तवतेचा स्पर्श स्पष्टपणे जागविण्यासाठी अगदी जसंच्या तसं सांगायला पाहिजेच असं नाही. असं नसावं.

मला स्वतःला ते 'ग्राम्य' शब्द खटकले नाहीत. मला आता या शब्दांची इतकी सवय झाली आहे की, त्यातलं नाविन्यच संपलं. *पण 'उपरा' जेव्हा माझ्या मुलीला वाचून* दाखवितो तेव्हा तेवढे शब्द वगळतो. खोट्या सभ्य भाषेच्या काही कल्पना माझ्याजवळ आहेत म्हणून नव्हे. 'उपरा'तील जीवन जर नीट समजून घ्यायचं असेल तर ते मोठ्याने वाचून दाखविलं पाहिजे. स्वतः लक्ष्मण माने यांच्या आवाजात मला ते ऐकायचं आहे. कैकाडी बोली आणि त्या बोलीऐवजी स्वीकारलेली ग्रामीण बोली मला लक्ष्मण माने यांच्या आवाजात ऐकायची आहे, याचं कारण या आत्मवृत्ताची बोली भाषा ऐकल्याशिवाय पूर्णपणे समजणारी नाही. त्यातील जिवंतपणा बोलकाच हवा. एरवी पान ८० वरील 'पायरीनं न्हात होतो' हे लक्षाचं वाक्य किती भयानक आहे, हे तुम्हाआम्हाला शहरात राहून कळणार नाही. या वाक्यानं जो स्फोट व्हायला पाहिजे, तो होत नाही. एका सहनशील पण संवेदना असणाऱ्या मनानं ते अत्यंत सौम्यपणे उच्चारलेलं वाक्य आहे.

जीएंची 'राधी', 'तुती', 'कैरी' या अभिजात सौंदर्यदृष्टी असलेल्या प्रतिभावंत कलाकारांच्या श्रेष्ठ कृती मला अस्वस्थ करतात. लक्ष्मीबाईंच्या 'स्मृतिचित्रा'तील जाणीवपूर्वक स्वीकारलेली आणि आत्मसात केलेली ती सहजता व तटस्थता!

'उपरा'—?

*वर्डस्वर्थचे शब्द पूर्णपणे साकार केलेली* ही निर्मिती आहे – To choose incidents and situations from common life, and to relate or describe them, throughout, as far as is possible in a selection of language really used by men. म्हणजे डिकन्स, हार्डी, लॉरेन्स, सिन्ज या कलाकारांनी बोली भाषेवर संस्कार करून प्रतिभेचा स्पर्श झालेली भाषा वापरली, त्या प्रकारची ही भाषा नाही. ती आहे मुळातली–जशीच्या तशी घेतलेली रांगडी भाषा कैकाडी भाषा वासापुरती आणि त्याला समान वाटणारी ग्रामीण बोली. तितकीच राकट, कचकचीत!

एका भल्या पहाटे 'बा' 'लक्षा'ला शाळेत घालतो तेव्हा त्याला ही कल्पनाही नसते की, पुढे शाळेचा व शिक्षणाचा हट्ट करून 'लक्षा' घरापासून दूर जाणार आहे. पोरगा चार–दोन इयत्ता शिकल आणि मग *त्याचं लगीन करून दिलं की, जातीत* राहून मार्गाला लागल अशी त्याची अपेक्षा असणार; पण तसं होत नाही. लक्षा एक एक परीक्षा पास होत जातो. निरगुडी सोडतो; फलटणला जातो, पुढे कॉलेजसाठी कोल्हापूर वसतिगृहाच्या व्यवस्थेत मदतनिसाचं काम करतो. कॉलेजच्या सगळ्या तासानाही हजर राहाता येत नाही. पी. डी. नीटपणे होतो. पुढं एफ्. वाय्. पासून तटे सुरू होतात. वसतिगृहाच्या नोकरीचा राजिनामा देतो. जेवणाचे हाल होतात. सवंगडी मदत करतात. मराठ्याच्या मुलीशी प्रेमसंबंध निर्माण झाल्यावर ते मित्रही त्याला सोडून जातात; पण हा शिक्षणाचा प्रवास कोणत्या एका जबरदस्त ओढीनं होत आहे असं कोठेही वाटत नाही, म्हणजे तशी शक्यता असूनही लक्ष्मण माने यांनी या प्रवासाला साहित्यिक डूब दिलेली नाही. कोठेही दयेची याचना नाही, द्वेषाचा स्फोट नाही. वेदनेचा वा विद्रोहाचा ताशा कोठेच बडविलेला नाही. म्हणजे या जीवनाच्या जाळपोळीतून निगरगट्टपणा आलेला आहे असंही नव्हे. शिक्षण अर्धवट सुटलेलं आहे. लग्न झाल्यामुळं संसाराची जबाबदारी आलेली आहे. नोकरी अजून कोठे मिळत नाही. अगदी उपवास घडावा अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा वेळी डॉक्टर दाभोळकर पिशव्या भरून *धान्य*, तेल, मिरची देतात. 'सामान घेऊन मी घरी कसा आलो, समजलं नाही; पण शशीला मी धड काय झालंय ते सांगूच शकलो नाही. किती तरी वेळ रडत बसलो!' ही कथा पुढची, त्यापाठीमागे फार मागे म्हणजे सातवीच्या परीक्षेला मास्तर निरगुडीहून मुलांना घेऊन फलटणला जातात. परीक्षा होते. परीक्षेनंतर मास्तर सर्वांचा फोटो काढून घेतात. गावातली एक मुलगी परीक्षेला बसलेली असते. तिला लक्षाजवळ बसावं लागतं. एवढ्या साध्या गोष्टीवरून पुढं बा ला मारझोड होते. गाव सोडावं लागतं. त्या फोटोमध्ये बा त्या मुलीमध्ये लक्षाला एवढासाही रस नाही. तो परत गावी जायला अधीर झालेला आहे. पुढचं रामायण त्याला बा कोणाला तरी सांगत असतानाच कळतं. 'बा रंगात येऊन यद्या मांगाला सांगत व्हता.

'आरं, यदू, निरगुडी सोडली, ती बरं झालं. *न्हाई तर माज्या लेकराला गावात* काट्यावर धरला व्हता. मला मारला. त्या आयला ती मऱ्हाट्याची माणसं. आपुन भिकारी! कुठं बराबरी करतूस? माझ्या कारट्याला न्हाय समजत!

'यदू म्हनत हुता, 'आरं काय झालं? का मारलं? काय तरी अन्याव घडला आसंल का नसंल...!'

'न्हय. सांगतो की, ह्यो परक्षाला गेला हुता. गावातल्या पाटलाची पोरगी बी परक्षेला हुती. फुटू काढला म्हनत्यात; पर मला समाजलंय त्ये त्यारच हाय! त्या पाटलाच्या पोरीसंग त्याच्यातलाच एक पोरगा हुता. त्याचं आन त्या पोरीचं जमत न्हवत. आन त्ये प्वॉर तर तिला धरीन म्हणून बसलं हुतं... म्हनताना माझ्या लेकरावर आळ घेतला की कैकाड्याच्या लक्षानं त्याला सांगितलं की, फुटू काढताना म्या तिच्या गळ्यात हात घातला असता तर ती माझी बायकू झाली आसती. आन मी तिला धरली आसती! आता, यदूदा, तूच सांग, ह्या पोराला काय समजतंय धरायचं...?'

सातवीत नापास झालं तरी आठवीत प्रवेश मिळत होता; पण बानं लक्षाचं लगीन ठरवलं तसा लक्षा घरातून पळून गेला. जाणार कुठं? फलटणला भावबंदाकडे गेला. त्यानं पुन्हा

घरी आणला तेव्हा शोधून शोधून पोरगा गमावला म्हणून सारी माणसं रडत होती. वा म्हनाला, 'लक्षा निकमिदा शयीराट् कीर राई पन हिंना या न्यानगत राइमान !' ('लक्षा, तुला काय करायचं ते कर, पन अशी डोस्क्यात राख घालून येड्यावानी करू नगं. घरी चल मुकाट्यानं !')

असा हा लक्षा. प्रथमपासून अखेरपर्यंत स्वच्छ मनाचा भोंगळ वा अजाण नाही. अनेक ठिकाणी अनेक गोष्टीत अपयश मिळालं असूनही पराभूत झालेला नाही. म्हणजे जगण्याच्या जिद्दीनं तो उभा आहे. आणि या त्याच्या आत्मवृत्तात त्याचा हा गुण सदैव जाणवतो. त्याच्या वाट्याला आलेलं जीवनच असं भेसूर आहे की, कोठेही मोकळेपणाने वागता येऊ नये खळखळून हसणं सोडाच, हा मुलगा कुठे साधा हसतानादेखील दिसत नाही. कोणीच दिसत नाहीत. मोकळा वारा नाही, स्वच्छ प्रकाश नाही. झुळझुळणारा प्रवाह असला तरी तहान इतकी तीव्र आहे त्या पाण्याच्या मंजुळ आवाजाचा आस्वाद घेण्याचं भान नाही. एवढं असूनही एकमेव आश्चर्याची गोष्ट म्हणजे या मुलाचं स्वच्छ मन स्वच्छच राहिलं आहे आणि अखेरपर्यंत तो पूर्णपणे मोडला नाही. जगण्याची चिवट ओढ टिकून राहिली आहे. ◻

उपरा
लक्ष्मण माने
ग्रंथाली प्रकाशन
पृष्ठे १६५, मूल्य १८ रु.

# चित्रपट

## ब्लॅक स्टॅलियन

### डोळ्यांना मेजवानी

अत्यंत साधी आणि लहान कथा असलेला, खूपच कलात्मक आणि तरीही दुर्बोध नसलेला आणि डोळ्यांना आणि पर्यायाने आपल्याला प्रचंड आनंद होईल असे छायाचित्रण असलेला चित्रपट म्हणून ' ब्लॅक स्टॅलियन ' या चित्रपटाकडे बोट दाखवावे लागेल.

काळ१९४६ चा वगैरे. बोटीतून प्रवासाला चाललेले बाप-लेक. त्याच बोटीत एक ताकदवान, खूप सुरेख काळाभोर घोडा त्या लेकाचे-अलेकचे लक्ष वेधून घेतो. तो बाप पत्त्यांमध्ये जिंकलेला धातूचा एक बहुमूल्य घोडा आपल्या पोराला भेट देतो. त्याच रात्री वादळ होते आणि बापलेकांची ताटातूट होते. त्या काळ्या घोड्याच्या समवेत तो पोरगा एका निर्जन बेटावर पोचतो. तिथे त्यांची मैत्री जमते. पुढे तो घरी येतो. एका हॉर्सट्रेनरच्या मदतीने तो या स्वैर घोड्याला शिस्त शिकवून एका महत्त्वाच्या रेसमध्ये भाग घेतो आणि शर्यत जिंकतो. बस एवढीच कथा !

संपूर्ण चित्रपट अलेक व तो काळा घोडा यांच्याभोवतीच केन्द्रित आहे. पहिला अर्धा भाग ती व ब्लॅक यांच्यामध्ये मैत्रीचे संबंध कसे प्रस्थापित होतात हे दाखवतो व त्या बेटावरून योगायोगाने सुटका होऊन घरी पोचल्यावर अलेक व ब्लॅकचे शिक्षण आणि शेवटची शर्यत एवढाच आहे.

चित्रपटाची कथा खूप लहान. वॉल्टर फार्लेची ही कादंबरी. कादंबरीमध्ये प्रत्येक प्रसंगाचे, व्यक्तिरेखेचे विस्तारपूर्वक वर्णन करता येते, पण चित्रपटात काय ? तेव्हा कमीत कमी दृश्यांमधून घटना व व्यक्तिरेखा दिग्दर्शक कॅरोल बॅलर्डने उभ्या केल्या आहेत. मग तो हॉर्सट्रेनरचा गौरवपूर्ण भूतकाळ असो, की अलेकचे त्या निर्जन बेटावरून घरी परतणे असो.

या चित्रपटाला मूकपट म्हणावे इतके या सिनेमात संवाद कमी आहेत. अत्यंत दृश्यप्रधान असा हा चित्रपट म्हणूनच खूपच आवडतो आणि दृश्यमयता म्हणाल तर डोळ्यांना खरोखरच मेजवानी आहे.

त्याची सुरुवात टायटल्सपासूनच होते. ' ब्लॅक स्टॅलियन ' हे नाव वाळवंटाची पार्श्वभूमी घेऊन येते आणि आपण खूष होतो. पुढे मग बदलाची दृश्ये आहेत, त्याही अगोदर समुद्र कापत चाललेली बोट आहे आणि नंतर ब्लॅक स्टॅलियन व अलेक हे त्या बेटावर असतानाची दृश्यमालिकाच सुरू होते. समुद्र, समुद्रकिनारा, दगड, कडे, सूर्योदय, सूर्यास्त, चंद्र, झाडे यांचे किती प्रकाराने नेत्रसुखद चित्रण करता येते ते येथे पहावे.

तांबूस, सोनेरी, निळी, काळी आणि इतर रंगछटा समुद्रावर दिसतात. समुद्राचं कधी शांत, तर खवळलेलं रूप दिसतं आणि त्या सर्वाच्या पार्श्वभूमीवर वाळूमध्ये स्वैर विहरणारा तो देखणा काळा घोडा ! त्याचे पाय कधी पूर्ण वेगात तर कधी स्लो-मोशनमध्ये, त्याची लयबद्ध उडणारी आयाळ हे सगळे बघताना वाहवा निघालीच पाहिजे.

अलेक व तो घोडा यांची मैत्री होण्याचा प्रसंग असाच गोड आहे. अगोदर तो घोडा बुजतो. एकाने पुढे व्हावे तर दुसऱ्याने मागे सरावे असे बराच वेळ चालते. शेवटी पडद्याच्या एका बाजूला पान धरलेला अलेकचा कोवळा गोरा हात आणि घोड्याचे काळेभोर तोंड दिसते, मध्ये निळे आकाश. ब्लॅक बिचकत विचकत एकदाचे पान तोंडात घेतो त्या वेळी मधला निळा रंग पूर्णपणे जातो. पुढच्या दृश्यात तर पडद्याच्या एका बाजूला अलेक व ब्लॅक जवळजवळ पूर्णपणे छायेत हरवून, एकाकार होऊन जातात आणि दुसऱ्या बाजूचा प्रखर प्रकाश त्या छायेची घनता वाढवतो.

पाण्याखालचे चित्रणही असेच मनोहर आहे. निळसर पाण्यात घोड्याचे काळे पाय आणि अलेकचं गोरं शरीर, अत्यंत सुरेख दिसतं. अलेक खूपच बुटका असतो म्हणून

तो ब्लॅकला पाण्यात घेऊन येतो आणि पोहत पोहत त्याच्यावर स्वार होतो. मग पुन्हा त्याची रपेट दाखवण्यासाठी अनेक कोनामधून, शॉटचे सर्व प्रकार वापरून, डिझॉल्व तंत्राचा प्रामुख्याने वापर करून नेत्रसुखद दृश्यमालिका दिग्दर्शक व छायालेखक कॅलेब डॅशनल सादर करतात. शेवटच्या दृश्यांमधले शर्यतीचे वातावरण मोजक्या चौकटीतून उभे करून प्रत्यक्ष शर्यत मात्र 'थरारक'पणे दाखवली आहे.

या शर्यतीच्या वेळीसुद्धा परमोच्च बिंदू (क्लायमॅक्स) आला असताना सगळा वेग एकदम कट करून, स्लो मोशनमधील निर्जन बेटावरील अलेक व ब्लॅकची रपेट दिग्दर्शक दाखवतो; पण तरीही त्यामुळे चित्रपटाची लय न बिघडता क्लायमॅक्सही व्यवस्थित पूर्णपणे सादर होतो हे वैशिष्ट.

निर्जन बेटावर घोड्याने सापाला मारणे, अलेकच्या घरून पळालेला घोडा हॉर्स ट्रेनरच्याच घरी जाणे वगैरे भडक प्रसंग असूनही ते तसे वाटत नाहीत. कारण पहिल्यापासूनच सर्व चित्रपट अद्भुतरम्यतेच्या पातळीवरचा आहे. एखादी परीकथा उलगडावी तसा आहे आणि या परिकथेचे नायक आहेत छोटा अलेक व ब्लॅक.

अलेकचे काम करणाऱ्या केली रीनोने खरोखरच ॲक्टिंगमध्ये तोडलाय... बालसुलभ उत्सुकता, बेटावर घाबरलेला, घोड्याच्या मैत्रीत मस्त राहणारा, त्याच्यावर जिवापाड प्रेम करणारा, प्रचंड मेहनत घेऊन शर्यतीचे तंत्र शिकणारा, शर्यतीमध्ये आकांतानं घोडा पिटाळणारा आणि शेवटी शर्यत जिंकल्यावर आनंदाने बेहोष होणारा अलेक केली रीनोनं समर्थपणे उभा केला आहे. त्याचं घोड्यावर बसण्याचं कौशल्यही वाखाणण्याजोगं आहे.

निवृत्त जॉकी आणि हॉर्स ट्रेनरचे काम केले आहे मिकी रूनी या जुन्या जाणत्या नटाने. आपल्या वाट्याची भूमिका त्याने उत्कृष्ट वठवली आहे.

या चित्रपटाविषयी काहीही लिहिणेवाचणे यात गंमत नाही. तातडीने तो पाहणे. संगीत व छायालेखन एकमेकांना पूरक म्हणजे काय ते येथे पहावे. चित्रपट हे दृश्यप्रधानच माध्यम आहे हे दिग्दर्शकाने छायालेखकासह सिद्ध करून दाखवले आहे.

बरे, हा चित्रपट फ्रान्सिस फोर्ड कोफील्सने फक्त 'सादर' केला आहे, दिग्दर्शित नव्हे; पण कॅरोल बॅलर्डचा हा पहिला चित्रपट वाटत नाही इतका सुरेख दिग्दर्शित केला आहे.

— निखिल गजेंद्रगडकर

---

# चित्रपटाबाहेर....

---

## 'जीवन'रूपी नारदाची गोष्ट

---

'नारद' हा देवाचा फुलटाइम पेड असा पृथ्वी नामक ग्रहावरील 'खास प्रतिनिधी'.गावंढळ भाषेत म्हणायचं झालं तर देवादिकांचा 'खबऱ्या!'आणि यामुळंच 'नारदा'ची प्रतिमा देवादिकांच्या पौराणिक कथामधून सातत्यानं आमच्या भारतीय मनावर बिंबवली गेली. गोष्टीवेल्हाळानी तिला आणखी खत–पाणी घातलं. परंतु हिंदी चित्रपटाच्या संदर्भात या नारदमहाशयांची आठवण काढाल तर फक्त आठवतो [जीवन नावाचा नट! लांब नाकाच्या या थोराड परंतु उटपटांग नटानं पौराणिक चित्रपटात नारदाची भूमिका सातत्यानं करून उच्छादच मांडला. 'नारायण, नारायण' म्हणत या 'जीवनरूपी' नारदानं अनेक भाकडकथाची पौराणिक चित्रपटांतून चक्क पारायणं केली. आता पुरे, पुरे, असं म्हणत दहा–वीस नव्हे तर तब्बल ५८ चित्रपटात 'नारदा'ची भूमिका करून जीवननं एक नवा जागतिक उच्चांकच प्रस्थापित केला आहे पौराणिक कथांमध्ये योग्य वेळी टपकणारा आणि पराचा कावळा करत.' चमचेगिरी' चा ठेका घेतलेला हा नारदरूपी जीवन नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत म्हणतो की, 'खरोखरच नारद जर या पृथ्वीतलावर अवतरला तर त्याला प्रथम माझीच भेट घ्यावी लागेल.' जीवन म्हणतो ते खरंच आहे. पण आता नारदाला (पूर्वी होता असं गृहीत धरू) पृथ्वीतलावर आगमन करायचं झालं तर त्याला जीवन या नटाचाच अवतार घ्यावा लागेल आणि पौराणिक चित्रपटांचं राखीव कुरण वगळता इतर चित्रपटामधून त्याला खलनायकांची हुजरेगिरी करणाऱ्या 'जीवन'ची कामं करावी लागतील हेही तितकंच खरं! ¤

'नारदा'च्या निमित्तानं हेही लक्षात येतं की, इथल्या फिल्लमवाल्यांना पौराणिक कथाच्या वेडानं कोणत्या थरापर्यंत झपाटलं आहे! ही फिल्लमवाली (गवळी म्हणू या!) मंडळी दरवर्षी नेमानं रामायण व महाभारतातील कथावर आधारित अशा पंधरा–वीस चित्रपटांचा रतीब घालतात. गेली तीस–चाळीस वर्षं हा रतीब घालण्याचा प्रकार न चुकता चालू आहे आणि या चित्रपटांचं प्रदर्शन करायला मुंबईच्या 'भारतमाता' व पुण्याच्या 'रतन', 'आर्यन' या चित्रपटगृहांचे पडदेही आसुसलेले आहेत. शिवाय अगदी रामायण–महाभारत नाही, पण त्यापासून प्रेरणा घेऊन 'लॉस्ट अॅण्ड फाउंड' या कथासूत्रावर बेतलेले आधुनिक 'रामायण–महाभारत' बनविल्याची शेखी मिरविणारे मनमोहन देसाईंसारखे बबैया व्यास, वाल्मिकी या फिल्लम दुनियेत पुष्कळ आहेत.

'मला माझ्या समृद्ध परंपरांचा अभिमान वाटतो' अशी प्रतिज्ञा घेणाऱ्या हिंदीवाल्याना या पौराणिकपटाचा सोस आहे, तर आमच्या मराठी चित्रपटकारांचा इतिहासच मुळी शिवाजीच्या जन्मापासून चालू होतो. (आता शिवाजीच्या जन्मतारखेबाबत मतभेद आहेत, तेव्हा इथेही तसे मतभेद अपेक्षित आहेत!) शिवाजी ते संभाजी या काळापुरताच इतिहास मराठी चित्रपटकारानी हजारो रिळांमध्ये गुंडाळला आहे.

'छत्रपती शिवाजी' हे प्रकरण इथल्या मातीत पुरेसे रुजले आहे, ते आणखीही रुजविण्याची आवश्यकता कोणीच नाकारीत नाही; परंतु त्यासाठी एकदा काढलेल्या चित्रपटाची दर पाच वर्षांनी पुनर्निमिती करणं खरोखरच आवश्यक आहे का? चित्रपटासारख्या खर्चिक माध्यमाचा विचार करता या मराठी चित्रपटातील आधुनिक बखरकारांनी नवी प्रिंट काढायचे सोडून हा नमता खटाटोप का चालविला आहे, हा प्रश्नच आहे.

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

बोलपटयुगापासून मराठीत छत्रपती शिवाजीचा इतिहास सांगणारे अथवा त्या काळातील व्यक्तींचे महात्म्ये पटविणारे सुमारे चाळीस-पन्नास चित्रपट निघाले. यात 'छत्रपती शिवाजी', सिंहगड', 'रायगड' 'नेताजी पालकर', 'थोरातांची कमळा', 'कल्याण खजिना' या चित्रपटाची पुनर्निमिती अनेकवार पूर्वीच्याच अथवा नव्या दिग्दर्शकांनी केली. बरं, पुनर्निमितीमागे पूर्वीच्या चित्रपटापेक्षा वेगळं काही सांगायचं आहे असंही नव्हे, तर पुन्हापुन्हा तेच सांगायचं व तेच दाखवायचं हाच एकमेव उद्देश.

चित्रपती शांताराम वणकुद्रे आणि अनेकांचे गुरू असलेले 'सेल्युलाईड बखरकार' भालजी पेंढारकरानी तर या पुनर्निमितीत उच्चांकच केला आहे.

आता हेच भालजी पेंढारकर 'गनिमी कावा' हा चित्रपट घेऊन येत आहेत. यात शिवाजीची भूमिका करणाऱ्या सूर्यकांत याचा 'नारदा'सारखाच या भूमिका करण्यात मराठीत उच्चांक आहे या चित्रपटाबरोबर महाराष्ट्र शासनाची अभूतपूर्व निर्मिती 'शेर शिवाजी' हा राम गबाले दिग्दर्शित चित्रपट येतोय. हा चित्रपट इंग्रजी व हिंदीतही काढण्यात आला असून मराठीतील सर्व बड्या कलाकारांनी यात भूमिका केल्या आहेत. इथे छत्रपती शिवाजीची भूमिका करणारे 'पेटंट' सूर्यकांत नसून परीक्षित सहानी आहेत. 'शेर शिवाजी' प्रदर्शित होण्याआधीच परीक्षित सहानींना छत्रपतीचे पेटंट देण्याचा उद्योग चालू झाला असून जिजाबाई प्रतिष्ठानच्या 'राजमाता' या चित्रपटातही ते शिवाजीचीच भूमिका करत आहेत.

या चित्रपटातूनही शिवाजीचे पोवाडे गायले जाणार आहेत, ते गाऊ नका असे कोणीच म्हणणार नाही; पण सारखे तेच गात राहा असे म्हणणे तरी कितपत सयुक्तिक दिसेल ?

—बिलंदर

# स. न. वि. वि.

मुखपृष्ठ १ वरून

शेतकऱ्याची स्वातंत्र्याची ऊर्मी लक्षात घेऊन काही धडे घेणे आवश्यक आहे. कोणतेही सरकार सरळमार्गी शेतकऱ्यांना न्याय देणार नाही हे सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांसाठी दिल्लीत रक्त साडू इच्छिणाऱ्या इंदिरा गांधी आणि त्याचे सरकार आपल्यासाठी निपाणीत शेतकऱ्यांचे रक्त साडवत आहे. ह्या प्रवृत्तीला लगाम लावायचा असेल तर आपणाला येथून पुढे आपल्या नव्या वाटांचा विचार करावा लागेल.

१. शेतकऱ्यांचे संघटन : गावोगावी फिरून शेतकऱ्यांशी शेतीविषयक धोरणासंबंधी बोलून, चर्चा करून सरकारी धोरण, आपल्या मागण्या, आपल्यावर होणारा अन्याय व त्याचे निर्मूलन व न्याय प्रस्थापन यासाठी संघटित प्रयत्न करणे व संघटित होणे कसे आवश्यक आहे हे शेतकऱ्यांना पटवून देऊन, त्यांना सामुदायिक कृतीसाठी संघटित करणे आवश्यक आहे.

२. शेतकऱ्यांचे प्रबोधन: राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय शेतीउत्पादन, उत्पादित मालाची विक्रीव्यवस्था, खरेदी-विक्रीसबंधी सरकारचे धोरण, त्यामध्ये शेतकऱ्यांवर होणारा अन्याय, उत्पादनखर्च, उत्पादन-किंमत व उत्पन्न यांची सागड केव्हा व कशी बसेल, देशाचे नागरिक या नात्याने आपले हक्क व कर्तव्ये कोणती यावर प्रबोधन होणे आवश्यक आहे. त्यासाठी गावोगावी सभा, मेळावे, group meetings होणे आवश्यक आहे. त्यातूनच सामुदायिक कृतीसाठी लोक तयार करता येतील.

३. प्रत्यक्ष कृती : जिथे जिथे सरकार व खाजगी व्यापारी याच्यामार्फत शेतीमालाची खरेदी-विक्री होत आहे तिथे तिथे जाऊन खरेदी-विक्री व्यवस्थेचा अभ्यास करणे, खरेदीव्यवहारात गैरव्यवहार, अन्याय, वशिलेबाजी होत असेल तर ते लोकाना विशद करून, पटवून देऊन, अन्याय निर्मूलनासाठी तातडीचा उपाय म्हणून सरकारी अधिकारी, खाजगी व्यापारी यांचेवर सामुदायिक कृतीतून दडपण आणणे, खरेदी-विक्री व्यवहारात योग्य बदल घडवून आणणें, त्यांच्या कामाविषयी जाब विचारणे व आवश्यक असेल तेव्हा रस्ता रोको इ. सारख्या मार्गांचा अवलंब करणे अशा प्रकारे विविध राज्यात विविध ठिकाणी खरेदी-विक्री केंद्रावर शेतकऱ्यामार्फत सामुदायिक कार्यक्रम घडवून आणल्यास अडचणीत सापडलेला, परिस्थितीने अगतिक झालेला शेतकरी जागा होईल. त्याच्यामध्ये असणाऱ्या शक्तीची त्यालाच अनुभूती येईल आणि व्यापक चळवळीसाठी तो तयार होईल. खरेदी-विक्री केंद्रावर अशा प्रकारे योग्य वेळी कृती घडून आली नाही तर मात्र शेतकरी हताश होऊन हळूहळू व्यापक चळवळीपासून आपोआप बाजूला फेकला जाईल.

ही सर्व कामे करण्यासाठी शाळा-कॉलेजातील विद्यार्थी, सामाजिक जाणीव असलेले लोक, विचारवंत लेखक, प्राध्यापक, सुजाण शेतकरी आणि डाव्या विचारसरणीच्या राजकीय संघटनांनी शेतकरी संघटना व त्याचे नेतृत्व यांच्याबरोबर लढयात उतरले पाहिजे. तरच विजय परुळकराच्या लेखमालेचे सार्थक झाले असे होईल.

नामदेव माळी
द्वारा, ग्रामायन
शिवतक्रार (म्हाळुंगी)
ता. शिरूर